बंदूकींचे तसेच शस्त्र व दारुगोळा होलसेल व रिटेल विक्रेते
परवाना धारकांसाठी बंदूक तसेच विना परवाना धारकांसाठी एअर गण, एअर पिस्टोल CO2 खरेदी-विक्री व दुरुस्ती
जिल्हा कमांडर राष्ट्रपती पदक विजेते
SINGH GUN HOUSE बंदुक घर
सर्व प्रकारचे ओरिजनल (खऱ्या) रिव्हॉल्व्हर, पिस्टल १२ बोर, रायफल शस्त्र व दारुगोळा विक्रेते
महाराष्ट्रातील सर्वात मोठे बंदुकी मिळण्याचे बंदुक घर
पत्ता : पत्रकार चौक, अहिल्यानगर
Mo. 9011808063 / 9860992722
शाखा : मुंबई, पुणे, नासिक, लातूर, सोलापूर, अहिल्यानगर, छ.संभाजीनगर, शिर्डी, परभणी, नवी मुंबई (वाशी), कल्याण, नागपूर, चाकण, शरदवाडी, श्रीरामपूर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

हिम वर्षावाचे सोबती
जरीवाला येथील
• जॅकेट • थर्मल • जर्किन
• स्वेटर्स • ग्लोज • सॉक्स
• कॅप्स् बरंच काही एकाच ठिकाणी
जरीवाला
• कापड बाजार, नं. 7666510765
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १६.०२.२०२६ | अंक नं. २६४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Since 1986
समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
संपर्क : ७७२२ ०१० २२२
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम
अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांसाठी चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# डोक्यात वार करून वृद्धाचा खून

## विळद बायपास परिसरात साईबन समोरील मैदानात आढळला मृतदेह

नगर – शहरातील विळद बायपास जवळील साईबन समोरील मोकळ्या पटांगणात एका ७५ वर्षीय वृद्धाचा अज्ञात व्यक्तीने निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.


बापूराव शिंदे (मयत)

बापू नामदेव शिंदे (वय ७५, रा. नवनागापूर, अहिल्यानगर) असे मृत वृद्धाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचा मुलगा मोहन बापू शिंदे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बापू शिंदे यांचा मृतदेह विळद बायपास जवळील साईबन समोरील एका मोकळ्या पटांगणात आढळून आला. अज्ञात आरोपीने कोणत्याही कारणावरून बापू शिंदे यांच्या डोक्यावर बोथट किंवा तीक्ष्ण हत्याराने गंभीर जखम करून त्यांचा जीव घेतला.

ही घटना १३ फेब्रुवारीच्या दुपारी २ ते १४ फेब्रुवारीच्या रात्री १०.४५ दरम्यान घडली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस स्टेशनचे स.पो.नि. माणिक चौधरी आणि पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही घटनास्थळाची पाहणी करून तपासाच्या सूचना दिल्या आहेत.

सध्या या खुनाचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकले नाही. एमआयडीसी पोलिसांनी कलम १०३ (१) भारतीय न्याय संहितेनुसार अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आरोपीचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही कार्यान्वित झाले आहे.

मयत बापू शिंदे हे शिवसेना शिंदे गटाचे उपशहरप्रमुख कैलास शिंदे यांचे ते वडील होत. यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. ही हत्या राजकीय द्वेषातून झाली की इतर काही कारणासाठी झाली. याबाबत शहरात चर्चा सुरु झालेली आहे. या प्रकरणाचा पोलिसांनी त्वरित तपास लावा, अशी मागणी नागापूर ग्रामस्थांमधून होत आहे.

# बेलेश्वर मंदिरात महिलेचे दागिने लंपास

नगर – भिंगार जवळील प्रसिद्ध बेलेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्र निमित्त दर्शनासाठी आलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना १५ फेब्रुवारीला सायंकाळी ६.१५ च्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

महाशिवरात्र असल्याने कापूरवाडी येथील रहिवासी असलेल्या शोभा राधाकिसन दुसुंगे (वय ६५) या १५ फेब्रुवारीला सायंकाळी ६.१५ च्या सुमारास बेलेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. मंदिरात भाविकांची वर्दळ असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सुमारे ६० हजार रुपये किमतीचे दहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले अत्यंत शिताफीने ओरबाडून नेले.

या घटनेनंतर शोभा दुसुंगे यांनी तातडीने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे चोरीचा गुन्हा नोंदवला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर आणि पोलीस हवालदार इनामदार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

धार्मिक स्थळी घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे भाविकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गर्दीच्या ठिकाणी महिलांनी दागिने घालून जावू नये तसेच आपल्या दागिन्यांची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार इनामदार करत असून परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्याचे काम सुरू आहे.

# केडगाव परिसरात घरातून चोरी, दागिन्यांसह रोकड लंपास

नगर – केडगाव परिसरातील जयहिंद कॉलनी, भुषणनगर येथील लिंक रस्त्यावरील सेवानिवृत्त व्यक्तीचा घरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून तब्बल २ लाख १९ हजार ५१८ रूपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नंदकुमार लक्ष्मण शेजुळ (वय ७२, रा. जयहिंद कॉलनी, भुषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजेपासून ते १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजेच्या दरम्यान ही घरफोडी झाली. अज्ञात चोरट्याने किचनमधील लोखंडी सेफ्टी दरवाजाचा कोयंडा तोडून तसेच मुख्य दरवाजा जबरदस्तीने उघडून घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील लाकडी कपाट उघडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन व कॅमेरा चोरून नेला. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये ९.५४० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन, ६.४५० ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या चैनी, १.१२० ग्रॅमचे सोन्याचे पदक, दोन तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस, २० हजार रूपये रोख रक्कम, २५ ग्रॅम वजनाची चांदीची नाणी, कॅमेरा व मोबाईल यांचा समावेश आहे. एकूण २ लाख १९ हजार ५१८ रूपयांचा ऐवज चोरट्याने लंपास केला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनास्थळ पंचनामा करण्यात आला असून डॉग स्कॉड व फिंगरप्रिंट पथकानेही पाहणी केली आहे. याबाबत १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक निरीक्षक सपकाळे करीत आहेत.

बदली ड्रायव्हर पाहिजे?
आता बुक करा – फक्त एका फोनवर!
– सुरक्षित आणि विश्वसनीय
– तुमच्या वेळेनुसार उपलब्ध
CONVINIO
9422727899
Office Add. : Dhoot Complex, Nagar-Manmad Road, A. Nagar

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

गुडघा किंवा हिप दुखत आहे? चालणे बसणे कठीण झाले आहे का?
अत्याधुनिक जॉईंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया
आरोग्यसदन हॉस्पिटल
डॉ. प्रशांत काळे
DNB ऑर्थोपेडिक सर्जन जॉईंट रिप्लेसमेंट व फ्रॅक्चर तज्ज्ञ
➔ गुडघा व हिप सांधा बदल
➔ शस्त्रक्रिया कमी वेदना
➔ लवकर बरे होणे
➔ अनुभवी व विश्वासार्ह उपचार
आरोग्यदायी हाडे सक्रिय जीवनासाठी भेट द्या आरोग्यसदन हॉस्पिटलला
Fracture Accident साठी तत्काळ उपचार
24/7 आपातकालीन सेवा
वेदना विसरा.. पुन्हा मोकळेपणाने चालायला सुरुवात करा.
पत्ता : नगर-मनमाड रोड, सावेडी नाका, सावेडी, अ.नगर. संपर्क : 8981008008


भावपुर्ण श्रद्धांजली
दुष्ट लागली सुखाला, आमच्यातुन नेले तुम्हाला..
प्रेम देता-देता आम्हांला, मध्येच हात सुटला..
असा खेळ नियतीने केला, दुःख सागरात
सोडुन दिले आम्हांला..
आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रद्धांजली
❋ दशक्रिया विधी ❋
मंगळवार दि. १७/०२/२०२६ रोजी, सकाळी ८.०० वा.
स्थळ : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे होईल.
स्व. सुभाष गुणाजी श्रीगोंदेकर
❋ दुःखांकित ❋
समस्त श्रीगोंदेकर परिवार



इंडियन क्रिकेट टिमने मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल मन:पुर्वक अभिनंदन..
20-20 वर्ल्ड कपच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

JOIN ONLY IN 4500/-
DISHA Computer Institute
MS-OFFICE, TALLY PRIME, ADV. EXCEL – 3 Month
CORELDRAW, PHOTOSHOP, CANVA – 3 Month
CAD 2D, CAD 3D, PHOTOSHOP – 3 Month
C LANG, C++, HTML – 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी बिगसाईज ब्रॅण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट, कुडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स, फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
❋ चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
❋ पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
❋ डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
❋ सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
❋ सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नगर-पाथर्डी रोडवर अपघात; एकाचा मृत्यू, तर १ जण जखमी

नगर – नगर पाथर्डी रोड वर मेहकरी (ता.नगर) शिवारामध्ये भरधाव टेम्पोने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात बाबासाहेब सेनापती कुटे (वय ५५, रा. गंगादेवी, ता. आष्टी) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, त्यांचे मित्र विठ्ठल भगवान नागरगोजे हे जखमी झाले आहेत.

याबाबत विठ्ठल नागरगोजे यांनी १५ फेब्रुवारी रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ते आपल्या बुलेटवरून मयत मित्र बाबासाहेब कुटे यांच्यासह जात होते. यावेळी सद्गुरु हायस्कूलसमोर समोरून चुकीच्या बाजूने येणाऱ्या टेम्पोने (क्र. एमएच ०४ जीएफ ५५७७) त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की बाबासाहेब कुटे यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर अज्ञात टेम्पो चालकाने जखमींना कोणतीही मदत न करता वाहन घेऊन घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलीस नाईक लोखंडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## मोहिनीबाई पवार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नालेगाव लांडे गल्ली येथील रहिवासी सौ. मोहिनीबाई बाळासाहेब पवार (वय ४८) यांचे १५ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, सासु, १ मुलगा, २ मुली, जावई, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे. पै. अक्षय पवार यांच्या त्या मातोश्री होत.

## दिलीप चंगेडीया यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भवानीनगर येथील रहिवासी दिलीप सुरजमल चंगेडीया (भानसहिवरावाला, वय ६८) यांचे १५ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. ते अमीत, लीना यांचे वडील तर अमृतलाल, राजमल, हिरालाल, अजितलाल, नवनीतमल, संजय, नितीन चंगेडीया यांचे ते बंधू होत.

## नितीन गांधी यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बुरुडगाव रोडवरील स्वाती कॉलनीतील रहिवासी नितीन कांतीलाल गांधी (कौडगाववाला, वय ६४) यांचे १४ फेब्रुवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ बहीण, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## संजय गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – साईनगर बुरुडगाव रोड येथील रहिवसी व मार्केटयार्ड येथील भुसार मालाचे व्यापारी, जय आनंद ट्रेडींग व केशर कृषी सेवा केंद्राचे संचालक संजय केशरमल गांधी (मांडवगणवाला) (वय ६५) यांचे १५ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १६ फेब्रुवारी रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, पत्नी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते स्वप्निल गांधी यांचे वडील होत.

## शंकर भारताल यांचे दु:खद निधन



नगर – जंगुभाई तालीम समोरील रहिवासी शंकर सताय्या भारताल (वय ६९) यांचे १५ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निलेश भारताल यांचे ते वडील होत.

## हस्तीमल लोढा (पुंडीवाला) यांचे संथारा व्रतात निधन



नगर – सथ्था कॉलनी अहिल्यानगर येथील रहिवासी हस्तीमल श्रीमल लोढा (पुंडीवाला) (वय ७६) यांचे १५ फेब्रुवारी रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते धानोरा येथे किरणा व्यावसाय करीत होते. संतोष, लोढा (पुंडीवाला), नूतन, कल्पना, निकिता यांचे ते वडील होत.



**हनुमान चालिसा पाठ**
मंगळवार दि. १७/०२/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०
श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
श्री. योगेश गुगळे (परिवार)
जे.एल.पी. टॉवर मागे, लिंक रोड, केडगाव मो.९०२८२०१४५३





भिंगार परिसरातील वडारवाडीच्या सौरभ नगर भागामध्ये नागरी वस्तीत घुसलेला बिबट्या, तसेच बिबट्या पाहण्यासाठी नागरिकांनी केलेली गर्दी.

# भिंगार परिसरात नागरी वस्तीत घुसला बिबट्या, वनविभागाने पकडले

नगर – भिंगार परिसरातील वडारवाडीच्या सौरभ नगर भागामध्ये १६ फेब्रुवारी रोजी सकाळी एका बिबट्याने नागरी वस्तीत घुसून चांगलाच धुमाकूळ घातला. या बिबट्याला वनविभागाच्या पथकाने मोठ्या परिश्रमाने पकडले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

वडारवाडीच्या सौरभनगर भागामध्ये १६ फेब्रुवारी रोजी सकाळी एक बिबट्या नागरी वस्तीत घुसला होता. त्यामुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, वनपाल नितीन गायकवाड, वनरक्षक अशोक गाडेकर, अर्जुन खेडकर, मनेश जाधव, विजय चेमटे, सुनिल धोत्रे, वन्यप्राणी अभ्यासक हर्षद कटारिया, प्राणीमित्र सचिन क्षीरसागर यांच्या सह वन कर्मचाऱ्यांनी बिबट्याला पकडण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. भिंगार कॅम्प पोलिसांचे पथकही घटनास्थळी दाखल झाले.

या परिसरात वनविभाग आणि पोलिसांचे रेस्क्यु ऑपरेशन सुरु झाले. एक – दीड तासांच्या अथक परिश्रमानंतर अखेर या पथकाने बिबट्याला जाळीत पकडले आणि त्याला पिंजऱ्यात कैद केले. रेस्क्यु ऑपरेशन पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या गर्दीला हटविण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. बिबट्या जेरबंद झाल्यानंतर या भागातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. तसेच वन विभागाने दाखविलेल्या तत्परतेबाबत समाधान व्यक्त केले.

### २ वर्षापूर्वी केडगाव मध्ये घुसला होता बिबट्या

२ वर्षापूर्वी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी केडगावातील शाहूनगर परिसरात दुपारच्या सुमारास बिबट्या आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. या बिबट्याने काही नागरिकांवर हल्ला ही केला होता. पोलिसांनी बघ्यांची गर्दी पांगवत परिसर रिकामा केला. त्यानंतर वनविभागाचं बचाव दल घटनास्थळी पोहोचलं आहे. वनविभागाचे पथक केडगाव परिसरात पोहचले खरे, मात्र त्यांच्याकडे बिबट्याला पकडण्यासाठी आवश्यक साधन सामग्री नव्हती, त्यानंतर आवश्यक साधनसामग्री आणून तीन ते चार तासांच्या अथक परिश्रमानंतर अखेर बिबट्या जेरबंद करण्यात आला होता. त्या प्रसंगाची आठवण आज पुन्हा एकदा झाली.

# दहशतवाद विरोधी पथकाची नगर शहरात अचानक छापेमारी

### मुकुंदनगर, सावेडी, कोठला भागात १२ ठिकाणी कारवाई, शस्त्रसाठाही जप्त



नगर – शहरातील मुकुंदनगर, सावेडी उपनगरातील तपोवन रस्ता परिसर व कोठला भागात १५ फेब्रुवारी रोजी पहाटेपासून महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) गुप्त छापेमारी मोहीम राबवून १२ घरांची झडती घेतली. सुमारे १०० ते १२५ अधिकारी-कर्मचार्यांच्या पथकाने एकाच वेळी विविध ठिकाणी कारवाई करत लॅपटॉप, मोबाईलमधील डिजिटल डेटा, संशयास्पद पुस्तके व कागदपत्रे ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ही कारवाई अत्यंत गोपनीय ठेवण्यात आली होती. पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास विविध वाहनांतून पथक शहरात दाखल झाले. स्थानिक पोलिसांना केवळ बंदोबस्तासाठी कळविण्यात आले होते; तपासाच्या स्वरूपाची माहिती त्यांना देण्यात आली नव्हती. त्यामुळे कारवाईदरम्यान संबंधित परिसरात तणावपूर्ण शांतता आणि उत्सुकता निर्माण झाली होती. पहाटे तीनपासून सुरू झालेली तपासणी दुपारी तीनपर्यंत सुरू होती. मुकुंदनगरमधील १०, तपोवन रस्ता परिसरातील एक आणि कोठला भागातील एका घरात सखोल चौकशी करण्यात आली. डिजिटल उपकरणांमधील डेटा जप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

कोणालाही ताब्यात घेण्यात आले नसले तरी काही तरूणांकडे कसून चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. कारवाईदरम्यान पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, स्वतः कार्यालयात हजर झाले होते. त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी बंदोबस्त देण्याच्या सूचना केल्या. शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच भिंगार कॅम्पचे सहायक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी संबंधित भागात उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. तथापि, एटीएसच्या अंतर्गत तपासात स्थानिक पोलिसांना सहभागी करून घेण्यात आले नव्हते. त्यांच्या भूमिकेपुरते बंदोबस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे काम मर्यादित ठेवण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, प्राथमिक चौकशीत काही धागेदोरे हाती लागले असून त्यावर आधारित पुढील टप्प्यात व्यापक कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अहिल्यानगरमध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर एटीएसची कारवाई झाल्याने शहरात दिवसभर चर्चांना उधाण आले होते.

### कट्टरवादी संपर्कांच्या पार्श्वभूमीवर कारवाई

सूत्रांच्या माहितीनुसार, काही तरूणांना कट्टरवादी विचारसरणीच्या संघटनांशी जोडण्याचा प्रयत्न होत असल्याची गुप्त माहिती एटीएसकडे होती. त्यानुसार अहिल्यानगरसह मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, जळगाव, सोलापूर, कोल्हापूर, सांगली येथील एटीएस विभागांचे अधिकारी या मोहिमेत सहभागी झाले होते. अहिल्यानगरमध्ये एटीएसची ही व्यापक आणि बहुआयामी कारवाई अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे. कट्टरवादी विचारसरणीच्या प्रभावाखाली तरूणांना सक्रिय करण्याचा प्रयत्न होत असल्याची शक्यता लक्षात घेता, सोशल मीडियाच्या माध्यमांतून वाढणार्या संपर्क जाळ्यांवरही यंत्रणांचे बारकाईने लक्ष असल्याचे या कारवाईतून स्पष्ट होते.

### दोन घरात आढळले शस्त्र; दोन गुन्हे दाखल

मुकुंदनगर परिसरातील दोन घरांवर कारवाईदरम्यान मोठा शस्त्रसाठा आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. अमीर हमजा जफर शेख (वय २१, रा.नॅशनल कॉलनी, दर्गादायरा रोड, मुकुंदनगर), असद जुबेर सय्यद (रा. नवेद कॉम्प्लेक्स, मुकुंदनगर) यांच्या घरातून दोन तलवारी, एक गुप्ती, एक फायटर, दोन चाकू, एक कोयता, एक एअरगन व ९९ छरे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील अमीर शेखला ताब्यात घेतले आहे. तर, अयान अन्वर शेख (वय २५, राजनगर, मुकुंदनगर) याच्या घरात सहा कोयते मिळून आले. या प्रकरणी भिंगार पोलिसात भारतीय हत्यार कायद्यानुसार दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले आहे. पुढील तपास सुरू असून शस्त्रसाठ्याचा संभाव्य वापर व त्यामागील हेतू याचा शोध घेतला जात आहे.

# शहरातील गांधी मैदान परिसरात 'वाहतूक कोंडी'चा प्रश्न ऐरणीवर

### रोजगारासाठी जाणाऱ्यांसह विद्यार्थ्यांना मनस्ताप; सिस्त लावण्याची मागणी



नगर – अहिल्यानगर शहराच्या मध्यवस्तीत असलेले गांधी मैदान हे परिसर सकाळच्या वेळेत नेहमीच गजबजलेले असते. शाळा, भाजीविक्रेते, नाश्त्याची दुकाने, दूध विक्रेते यामुळे या भागात मोठ्या प्रमाणावर वर्दळ पाहायला मिळते. अलीकडेच रस्त्याचे रुंदीकरण झाले असतानाही सकाळच्या वेळेत रस्त्यावर आडवे-तिडवे वाहने उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे.

विशेषतः भाजीविक्रेते व दूध विक्रेते रस्त्यावरच थांबून व्यवसाय करीत असल्याने वाहनचालकांना अडथळा निर्माण होतो. याचा फटका रोज कामावर जाणाऱ्या नोकरदार वर्गाला बसत असून, वेळेवर कार्यालयात पोहोचणे कठीण झाले आहे. अनेकदा दूध विक्रेत्यांशी व वाहनचालकांमध्ये वादविवाद होण्याचे प्रकारही घडत आहेत.

या वाहतूक कोंडीचा परिणाम शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवरही होत असून, त्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सकाळच्या गर्दीमुळे अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर गांधी मैदान परिसरात भाजीविक्रेते, दूध विक्रेते व वाहन पार्किंग याबाबत प्रशासनाने ठोस नियमावली लागू करावी, तसेच वाहतूक पोलिसांनी नियमित नियंत्रण ठेवावे, अशी मागणी स्थानिक नागरिक व दुकानदारांकडून करण्यात येत आहे. वेळेत योग्य सिस्त लावली नाही, तर हा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## भिंगारच्या आलमगीर परिसरात कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा

### ८० किलो गोमांस जप्त करत पोलिसांनी एकाला केली अटक

नगर – महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असतानाही, शहरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्री करणाऱ्या एका इसमावर भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई केली आहे. भिंगार येथील आलमगीर परिसरात १५ फेब्रुवारीला सकाळी पोलिसांनी छापा टाकून ८० किलो गोमांसासह एका आरोपीला रंगेहाथ पकडले.

आलमगीर मदरसा समोरील जमजम किराणा दुकानाशेजारी असलेल्या एका गाळ्यात गोवंश जनावरांची कत्तल केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार १५ फेब्रुवारीला सकाळी पावणे नऊ वाजेच्या सुमारास पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी १६ हजार रुपये किमतीचे ८० किलो गोमांस आणि मांस कापण्यासाठी वापरलेले लोखंडी सत्तूर असा एकूण १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार दिलीप विजय झरेकर यांनी फिर्याद दिली असून, त्यावरून पोलिसांनी फैजान शफीक शेख (वय २०, रा. सदर बाजार, भिंगार) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. आरोपी हा स्वतःच्या फायद्यासाठी गोवंशाची कत्तल करून त्याचे मांस विकण्याच्या उद्देशाने ते ताब्यात बाळगताना मिळून आला. सहायक पोलीस निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक शाहीद सलीम शेख या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.



केमिकल पासून बनावट दूध तयार करणाऱ्या केंद्रावर छापा टाकल्यानंतर पकडलेल्या आरोपींच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

## केमिकल पासून बनावट दूध तयार करणाऱ्या केंद्रावर छापा

### तीन जण ताब्यात, १७ लाख ३२ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – जिल्ह्यात आरोग्याशी खेळ करणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. केमिकलपासून बनावट दूध तयार करून ते बाजारात विक्रीसाठी पाठवणाऱ्या दूध संकलन केंद्रावर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. तब्बल १७ लाख ३२ हजार ८१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने १४ फेब्रुवारी रोजी जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे छापा टाकला. पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांसह संबंधित दूध संकलन केंद्रावर कारवाई केली.

छाप्यात सहा ड्रममध्ये १,१९८ लिटर 'पॅराफिन' केमिकल आढळून आले. तसेच ३०० किलो पांढरी पावडर आणि ३२० लिटर तयार कृत्रिम दूध जप्त करण्यात आले. आरोपींनी या केमिकलपासून सुमारे २४ हजार लिटर बनावट दूध तयार होत असल्याची माहिती दिल्याचं समोर आलं आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी हे दूध मानवी आरोग्यास घातक असल्याचे स्पष्ट केले आहे.

कारवाईदरम्यान दोन पिकअप वाहनांसह एकूण १७ लाख ३२ हजार ८१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. जिल्ह्यात दूध भेसळ करणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा कायम राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## तपोवन रोडवर पत्र्याच्या खोलीतून मजुराच्या पगाराची रोकड अज्ञात चोरट्याने पळविली

नगर – शहरातील एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने १० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

शहरातील तपोवन रोड परिसरातील ढवण वस्ती येथे राहणारे ज्ञानेश्वर रघुनाथ कनोरे (वय ३०) यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. कनोरे यांच्याकडे बांधकाम मिस्तरी म्हणून काम करणाऱ्या विकास टंडन याच्या पगाराचे १० हजार रुपये घरात ठेवलेले होते. १४ फेब्रुवारीच्या रात्री ११ ते १५ फेब्रुवारीच्या पहाटे ४ वाजेच्या दरम्यान, अज्ञात चोरट्याने संधी साधून कनोरे यांच्या घराच्या पत्र्याच्या दरवाजाची तार तोडून आत प्रवेश केला.

चोरट्याने घरातील रोकड लंपास करून पोबारा केला. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दिवटे करत आहेत. शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

## अहिल्यानगर येथे १८ फेब्रुवारी रोजी पेन्शन अदालत

नगर – अहिल्यानगर कोषागार कार्यालय आणि महालेखापाल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त वेतनधारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी १८ फेब्रुवारी रोजी पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. ही पेन्शन अदालत सकाळी १०.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन संदर्भातील विविध प्रश्न, तांत्रिक अडचणी, त्रुटीमुळे प्रलंबित असलेली प्रकरणे तसेच वेतननिर्धारणातील शंका यांचे मार्गदर्शन या बैठकीत करण्यात येणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष संवाद साधून समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या पेन्शन अदालतमध्ये विविध राष्ट्रीयकृत बँकांचे व्यवस्थापक देखील उपस्थित राहणार असून बँक व्यवहार, पेन्शन जमा होण्यातील अडचणी, जीवन प्रमाणपत्र, खाते संबंधित त्रुटी आदी विषयांवर मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

ज्या सेवानिवृत्तांचे प्रकरणे कागदपत्रांच्या त्रुटीमुळे अथवा तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन संबंधित विभागाकडून करण्यात आले आहे.

रमेश देशमुख यांनी सर्व सेवानिवृत्त वेतनधारकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. पेन्शन अदालत हा उपक्रम सेवानिवृत्तांच्या प्रश्नांचे जलद आणि पारदर्शक निराकरण करण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# गृहिणी

## आरोग्य

### चॉकलेटस् खा हेल्दी राहा...

आज बाजारात अनेक प्रकारचे चॉकलेट उपलब्ध आहेत, परंतु डार्क चॉकलेट सर्वोत्तम आहे. त्यात साखर कमी असते किंवा अजिबात नसते, ज्यामुळे ते तुमच्या आरोग्यासाठी सर्वात फायदेशीर ठरते. आजकाल, ते इतके आकर्षक आणि वैविध्यपूर्ण चवींमध्ये उपलब्ध आहे की तुम्हाला हवे असले तरीही तुम्ही ते टाळू शकत नाही. हो, जर तुम्ही कोणत्याही प्रकारच्या ताणतणावात असाल, तर चॉकलेट हा तुमचा परिपूर्ण साथीदार आहे, जो एक शब्दही न बोलता तुमचा ताण कमी करू शकतो. चॉकलेटमध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स असतात, जे तुमच्या त्वचेवरील वृद्धत्वाची लक्षणे आणि सुरकुत्या कमी करण्यास मदत करतात. यामुळे तुमची त्वचा तरुण दिसते. त्याच्या गुणधर्मांमुळे, चॉकलेट बाथ, फेशियल, पॅक आणि मेण आता लोकप्रिय आहेत कमी रक्तदाब असलेल्यांसाठी चॉकलेट अत्यंत फायदेशीर आहे. रक्तदाब कमी झाल्यावर चॉकलेट तात्काळ आराम देते. म्हणून, नेहमी चॉकलेट सोबत ठेवा. चॉकलेट मेंदूतील रक्ताभिसरण सुधारते.

## पाककला

### पिझ्झा समोसा

**साहित्य** : समोसा पट्टी १०, तेल, शिमला मिरची एक बारीक चिरलेली, टोमॅटो एक बारीक चिरलेला, हिरवी मिरची एक बारीक चिरलेली, मोझरेला चीज अर्धा कप किसलेले, टोमॅटो सॉस दोन चमचे, ओरेगॅनो अर्धा टीस्पून, चिली फ्लेक्स अर्धा टीस्पून चवीनुसार, काळी मिरी पूड अर्धा टीस्पून, चवीनुसार मीठ

**कृती** : सर्वात आधी एका पॅनमध्ये थोडे तेल गरम करा आणि त्यात चिरलेली शिमला मिरची, हिरव्या मिरच्या आणि टोमॅटो घालावा. तसेच दोन मिनिटे परतून घ्या. आता टोमॅटो सॉस, ओरेगॅनो, चिली फ्लेक्स, काळी मिरी पूड आणि मीठ घालून चांगले मिक्स करा. हे मिश्रण दोन मिनिटे शिजवा आता गॅस बंद करा आणि थोडे थंड होऊ द्या. आता किसलेले मोझरेला चीज घालावे आणि चांगले मिसळा. आता समोशाची पट्टी घ्या आणि त्यांना अर्धे घडी करून त्रिकोणी आकार द्या. तसेच आता त्यात तयार केलेले पिझ्झाचे मिश्रण भरा. नंतर समोसा दोन्ही बाजूंनी दाबून व्यवस्थित बंद करा. आता एका पॅनमध्ये तेल गरम करा. आता समोसे घाला आणि मध्यम आचेवर सोनेरी तपकिरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा. तळलेले समोसे टिश्यू पेपरवर काढावे.

## वास्तू

### घरात ठेवा घुबडाची मूर्ती

करोडपती लोक आपल्या घरात घुबडाची प्रतिकृती नक्कीच ठेवतात. घुबडाला लक्ष्मीचे वाहन मानले जाते. असे म्हणतात की घुबडांवर देवी लक्ष्मीचा विशेष आशीर्वाद असतो, म्हणूनच श्रीमंत लोक आपल्या घरात घुबडाची मूर्ती ठेवतात. यामुळे उत्पन्न झपाट्याने वाढते आणि मालमत्ता खरेदी करण्याची संधीही मिळते.

## सौंदर्य

केस शॅम्पू करताना टाळूला मसाज करावे असे केल्याने रक्तप्रवाह वाढतो.

## सल्ला

लसूण कोमट पाण्यात ठेवा आणि १५-२० मिनिटे तसेच ठेवा. पाण्यातील ओलावा लसणाची साल पूर्णपणे सैल करतो. आता लसूण हलक्या हाताने घासून घ्या. साल आपोआप निघून पाण्याच्या वरच्या बाजूला तरंगेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६

**दर्श अमावास्या, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, माघ कृष्णपक्ष, धनिष्ठा २१।१६, सूर्योदय ०६ वा. ४० मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : शत्रूंना मात द्याल. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल.

**वृषभ** : आरोग्याची काळजी घ्याल. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे तोट्याचे ठरेल.

**मिथुन** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील.

**कर्क** : मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता.

**सिंह** : आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. आपल्या इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**कन्या** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**तूळ** : वाहने चोरीस जातील. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई केल्यास नुकसान होईल.

**वृश्चिक** : पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**धनु** : बेपर्वाईने कार्य केल्याने नुकसान, कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल.

**मकर** : मागील एखादे बाकी राहिलेले काम आज पूर्ण होईल. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल.

**कुंभ** : हितशत्रूंवर मात कराल. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**मीन** : आज आपल्या आयुष्यात आपल्या नातलागांची व मित्रांची चांगली भूमिका रहाणे शक्य आहे. बळात वाढ होईल.

## शब्दगंध क्र. ७३६८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | ९ | |
| | ■ | १० | | ■ | ११ | | ■ |
| | ■ | | ■ | १२ | | | १३ |
| १४ | १५ | ■ | १६ | | ■ | १७ | |
| ■ | १८ | १९ | ■ | २० | २१ | ■ | |
| २२ | | | २३ | ■ | २४ | २५ | ■ |
| २६ | | ■ | २७ | | | | |

**आडवे शब्द :-** १) टाळी किंवा टाळीचा आवाज ७) झाड; वृक्ष ८) नाव; बोट; जहाज १०) शिजलेल्या भाताचा प्रत्येक कण ११) अनेक लोक एकत्र येऊन केलेली मोठी वसाहत १२) केरळमधील एक जिल्हा १४) दृष्ट लागू नये म्हणून बाळाच्या गालाला लावतात तो काजळाचा ठिपका १६) सुविधा १७) खांबांवर टाकण्यात येणारी आडवी तुळई १८) पृथ्वी; धरती; वसुंधरा २०) हक्क; वाद; फिर्याद २२) थंडीपासून बचाव करण्यासाठी कानाला गुंडाळतात ते लोकरीचे लांबट वस्त्र २४) एक धान्य ज्याचे कणीस भाजून खातात २६) विटीदांडूच्या खेळात दांडूने विटी जेथून कोलतात तो छोटा खड्डा २७) सारख्या स्वभावाचा

**उभे शब्द :-** १) प्राणायामचा एक प्रकार २) दांत; सुळे ३) लहानसहान गोष्टींचे केलेले टिपण ४) झेंडा; पताका; निशाण ५) हरिणाची एक जात ६) धर्मार्थ देणे ९) जोंधळ्याचा दाणा १२) मुदतीविषयीचा करार १३) उतरण; ढाळ; कडपा; टेकडी १५) साल; कवच; आवरण १९) वर्ष; आवरण; शक; सन; त्वचा २१) विष्णूचा पाचवा अवतार २२) नंतर; पुन्हा २३) फळातील किंवा उसातील द्रव २५) वाराणसीचे दुसरे नाव; बनारस

### शब्दगंध क्र. ७३६७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | न | ग | र | ■ | म | रा | ल |
| रा | व | ण | ■ | ख | ल | ■ | स |
| म | ■ | गो | वा | ■ | म | ज | ल |
| पू | ■ | त | प | शी | ल | ■ | शी |
| र | स | ■ | स | ल | ■ | प | त |
| ■ | का | पा | ■ | वं | ग | ण | ■ |
| त | र | त | री | त | ■ | जो | ग |
| ट | ण | क | ■ | ■ | अं | बा | डी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : राजकारण हा एक खेळ आहे, हुशार लोक तो खेळतात आणि मूर्ख लोक दिवसभर त्यावर चर्चा करतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'भांग' म्हणजे नशा?

हा विषय खूपच रंजक आणि माहितीपूर्ण ठरू शकतो, कारण आपल्याकडे 'भांग' म्हटलं की फक्त नशा आठवते. पण आयुर्वेदात याला 'विजया' असं नाव दिलं आहे आणि तिला अत्यंत गुणकारी औषधी मानलं आहे. महाशिवरात्रीच्या काळात प्रसादाच्या नावाखाली भांगेचे सेवन मोठ्या प्रमाणात केले जाते. पण, आयुर्वेदाच्या प्राचीन ग्रंथांमध्ये भांगेला 'विजया' किंवा 'सिद्धी' असं म्हटलं गेलं आहे. चला तर मग, भांगेबद्दलचे गैरसमज दूर करून त्यातील औषधी विज्ञानाचा शोध घेऊया.

आयुर्वेदानुसार भांग ही चवीला कडू (तिक्त) आणि उष्ण स्वभावाची असते. जर ती शुद्ध करून आणि योग्य प्रमाणात घेतली, तर ती अनेक रोगांवर रामबाण उपाय ठरते. अथर्ववेदातही पाच महत्त्वाच्या औषधी वनस्पतींमध्ये भांगेचा समावेश केला आहे.

सांधेदुखी, स्नायू दुखणे, काही न्यूरोपॅथिक वेदनांमध्ये सहाय्यक ठरू शकते.

भूक व पचन : मंदाग्नी, भूक न लागणे अशा स्थितीत दीपन-पाचन म्हणून मर्यादित उपयोग.

झोप व तणाव : अतिचिंता, अस्वस्थता, झोप न येणे-यात शांततादायक प्रभाव (योग्य मात्रेत).

कफ-विकार : काही श्वसनविकारांत कफ शोषणास मदत.

जुनाट अतिसार/आमांश : ग्रंथांमध्ये नियंत्रित वापराचा उल्लेख आढळतो.

मोठे गैरसमज आणि सत्य

भांग म्हणजे फक्त नशा आयुर्वेदात ती औषधी वनस्पती म्हणून वर्णिलेली आहे पण नियमांसह. घरच्या घरी घेतली तरी चालते चुकीचे शुद्धीकरण, मात्रा आणि रुग्णस्थिती अत्यंत महत्त्वाची. नैसर्गिक आहे म्हणजे सुरक्षित नैसर्गिक असूनही अति/चुकीचा वापर धोकादायक ठरू शकतो.

आयुर्वेद स्पष्ट सांगतो की, अति सर्वत्र वर्जयेत. चुकीच्या पद्धतीने घेतलेली भांग शरीरासाठी घातक ठरू शकते: मानसिक गोंधळ, भ्रम, चिडचिड, हृदयगती वाढणे, स्मरणशक्तीवर परिणाम, सवयीचे धोके, गर्भवती महिला, मानसिक आजार असलेले रुग्ण, हृदयरोगी यांनी टाळावे. वारंवार आणि चुकीच्या प्रमाणात घेतल्यास याचे व्यसन जडू शकते, जे मानसिक आरोग्यासाठी हानीकारक आहे.

भारतामध्ये भांगेबाबत कायदे राज्यागणिक वेगळे आहेत. आयुर्वेदिक औषधांमध्ये वापर परवाना असलेल्या वैद्य/उत्पादकांपुरताच मर्यादित असतो. स्वतःहून वापर करणे कायदेशीर व आरोग्यदृष्ट्या धोकादायक ठरू शकते. भांगही ना पूर्णतः वाईट ना सर्व रोगांवर रामबाण आहे. ती दुधारी तलवार आहे. योग्य हातात औषध, चुकीच्या वापरात विष. म्हणूनच, आयुर्वेद सांगतो: युक्ती, मात्रा आणि मार्गदर्शन हीच खरी किल्ली.

अनेकांना वाटतं की महादेव नशा करतात, म्हणून भांग प्यावी. पण आध्यात्मिक दृष्टिकोनातून, शिव हा 'विष' प्राशन करणारा देव आहे. भांग ही मनावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि ध्यान करण्यासाठी औषधी म्हणून वापरली जात असे, ती नशा करून गोंधळ घालण्यासाठी नाही.

भांग ही कायदेशीररीत्या प्रतिबंधित असू शकते आणि वैद्यकीय सल्ल्याशिवाय तिचे सेवन करणे आरोग्यासाठी तसेच कायद्यानुसार धोक्याचे आहे. हा लेख केवळ माहितीसाठी आहे. वेबदुनिया याची जबाबदारी घेत नाही. कोणतेही उपाय किंवा सल्ला अमलात आणण्यापूर्वी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

### गाय आणि वाघ

एकेकाळी, एका लहानशा गावात एक गाय तिच्या वासरासह राहत होती. ती चरायला जंगलात जायची. संध्याकाळी ती तिच्या शहरात परतल्यावर तिचे वासरू तिचे दूध पिई. गायीला तिचे वासर खूप आवडायचे.

एके दिवशी, गाय जंगलात चरत असताना, जंगलात जाताना काही अंतरावर एका वाघाने तिला पकडले. वाघ त्याची भूक भागवण्यासाठी गायीला मारू इच्छित होता. गायीने वाघाला विनंती केली, माझ्या घरी एक वासरू आहे आणि ते खूप भूक लागले आहे. जर तू मला आता मारलेस तर माझे वासरू उपासमारीने मरेल. म्हणून, तिने वाघाला विनंती केली की तिला थोडा वेळ राहू दे जेणेकरून ती तिच्या वासराला वाढवू शकेल. वाघाने गायीची विनंती ऐकली आणि म्हणाली, ते अशक्य आहे. जर मी तुला सोडले तर तू कधीही परत येणार नाहीस.

गाय वाघाला म्हणाली, मी माझ्या वासराला चारा देऊन परत येण्याचे वचन देते. वाघाने गायीची कळकळीची विनंती ऐकली आणि शेवटी म्हणाली, तू जाऊ शकतेस, पण तुला लवकरच परत यायला हवे.

गाय ताबडतोब तिच्या गावात परतली आणि तिच्या वासराला दूध पाजले. मग ती पुन्हा जंगलात निघून गेली आणि तिच्या वासराला लवकरच परत येईल असे आश्वासन देत ती पुन्हा जंगलात गेली. लवकरच, ती जंगलात पोहोचली आणि रडू लागली. वाघ गायीला शोधत होता आणि तिला परत पाहून आश्चर्यचकित झाला. वाघाने कधीही कोणत्याही प्राण्याकडून इतके गांभीर्य, नैतिकता आणि प्रामाणिकपणा अनुभवला नव्हता. गायीच्या प्रामाणिकपणाने तो प्रभावित झाला आणि वाघ म्हणाला, मी तुला कोणत्याही प्रकारे इजा करू शकत नाही. त्याऐवजी, मी भविष्यात इतर वन्य प्राण्यांपासून तुझे रक्षण करेन. सूर्योदयापूर्वी गाय तिच्या वासराकडे परतली आणि ते आनंदाने जगले.

तात्पर्य : प्रामाणिकपणा नेहमी आपल्याला तेजस्वी बनवत असतो.

## जीवन का अमृत (भाग १)



प्रयोग किया जा सकता है, वह है पाँच सिद्ध नामों के जाप का। केवल असली रूप ही ठहरेगा और सभी नकली, काल के स्वरूप, गायब हो जाएँगे। कभी-कभी दोनों स्वरूप, सतुगुरु का और सतुगुरु के सतुगुरु का, इकट्ठे आ जाते हैं और कभी अकेले-अकेले । आप उस सतुगुरु की प्रेमपूर्वक भक्ति करते हैं, जिससे आपने नामदान लिया है। पर वे एक ही हैं, दो नहीं। जब एक बल्ब फ्यूज हो जाता है, तो दूसरा लगा दिया जाता है, जिससे भी वही ज्योति निकलती है, क्योंकि ज्योति एक है। शब्द शरीर में समाकर, हमारे बीच रहता है, सचाई और दया से ओत-प्रोत । अवश्य ही, सभी सतुगुरु शब्द मुजस्सम (देहधारी)

### अंतरात्मा

थे, अपने-अपने जमाने में ।

अंतर में जाने पर, दूसरे संतों के स्वरूप भी आ सकते हैं। हम हर एक का आदर करते हैं। पर याद रखो कि शिष्य का अपना सतुगुरु, उसकी जिंदगी एवं मौत और उसके बाद भी सँभाल करता है। शिष्य का सतुगुरु अवश्य प्रकट होगा और यदि सतुगुरु का सतुगुरु आता है, तो वह हमेशा सहायक होता है। आपको नामदान के समय जो कुछ भी बताया गया है, उसका अक्षरश: पालन करो और किसी ऐसे के बहकावे में न आओ, जो इस रास्ते पर पूर्ण नहीं है। यदि हमारा विश्वास डगमगाने लगेगा, तो खतरा है कि हम अनजाने में किसी गलती में गिर जाएँगे। हममें से बहुत से सतुगुरु बाबा सावन सिंह जी के कदमों में बैठे, पर उन्होंने हर एक को नामदान का कार्य नहीं सौंपा। ईसा मसीह ने कहा, यदि तुम मुझमें बसोगे और मेरे शब्द तुममें बसेंगे, तो तुम जो कुछ भी माँगोगे, तुम्हें मिलेगा। आपने बाबा सावन सिंह जी जैसा एक स्वरूप, अस्पष्ट सा देखा है। सपने में सतुगुरु का करीबन दो घंटे आपके पास होना एक शुभ घटना है, क्योंकि यह आप पर उसकी दया और सुरक्षा को दर्शाता है। सतुगुरु और उसके सतुगुरु के नूरी स्वरूप का प्रकट होना बहुत उच्च कोटि का वरदान है और यह दर्शाता है कि वे आपको अपनी प्यार भरी सुरक्षा, यहाँ है जो समस्त वातावरण के साथ साथ योगी की आत्मा, मन तथा सम्पूर्ण शरीर को सुगंधित कर देती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

इसी तरह कोई व्यक्ति, चाहे विश्व में कहीं भी रहता हो, हमारे बारे जब कभी अच्छा व बुरा सोचता है, हमें उसी समय प्राप्त हो जाते हैं। यह काम सहस्त्रार केन्द्र करता है।

सहस्त्रार - ५- राडार

सहस्त्रार चक्र एक रडार का काम करता है। दूर दराज के व्यक्तियों की शक्लों को एमर्ज करता है। भगवान तथा सूक्ष्म लोकों को देखता है तथा उनकी तरंगे पकड़ता है।

यह जो हम कल्पना में देखते हैं यह सहस्त्रार का रडार है। मनसा सेवा द्वारा भिन्न भिन्न लोगों को तरंगे भेजते हैं ये सब सहस्त्रार में स्थित रडार ही करता है। यह चक्र सबसे सर्वोत्तम, अद्भुत प्रश्न

### परम रहस्यमयी

परम रहस्यमयी है। वास्तव में यह योग चक्र सूक्ष्म शरीर का बहुत बड़ा भाग है। जिस व्यक्ति का आज्ञा चक्र और सहस्त्रार चक्र जितने अधिक विकसित होंगे, उतना ही अज्ञात, चमत्कारी एवं सूक्ष्म प्रभाव उसके अन्दर विद्यमान होगें।

योग में ऊंच से ऊंच स्थिति प्राप्त करने के लिये और सहस्त्रार चक्र को जागृत करने के लिए, शरीर विज्ञान, रसायन विज्ञान, मुद्रा विज्ञान, भाषा विज्ञान, शब्द विज्ञान, आत्म विज्ञान, संगीत विज्ञान आदि का भी बहुत गहराई से अध्ययन करना चाहिये।

सहस्त्रार चक्र एक हजार पत्तों के कमल पुष्प की भांति दिखाई देता है। परंतु विशेष रुप से गिनने पर केवल ९६० पत्ते ही दिखते हैं। समाधि के प्रभाव से यह चक्र तीव्र गति से घूमने लगता है तो प्रायः एक फुट का हो कर घूमने लगता है। उस समय इसकी छटा देखने लायक होती है। अगर मन में ५ विकारों का सूक्ष्म अंश भी है तो यह चक्र नहीं दिखेगा। जब पांच विकारों को मन में पैदा भी नहीं होने देते हैं, उस समय ये चक्र बहुत तेजी से घूमता है और मनमोहक होता है। साथ ही एक मनमोहक सुगंध उत्पन्न होती है जो समस्त वातावरण के

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : तुला एकूण किती भाऊ?
मुलगी : तुला धरुन तीन

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या देशाच्या मिरा आंद्रिगाने दुबई खुल्या टेनिस स्पर्धेचे विजेतेपद जिंकले आहे? - रशिया

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : अननस आम्ल मधुर, शीत वीर्यात्मक व उत्तम पाचक असते.

आधुनिक शास्त्रानुसार : अननसात 'क' जीवनसत्त्व हे भरपूर प्रमाणात असते. त्याचबरोबर अननसामध्ये ८७% सायट्रिक आम्ल व १३% मॅलिक आम्ल असते. ही दोन्ही आम्ले शरीरास पोषक असतात. ही आम्ले शरीरात शोषली जाऊन उष्णता व ऊर्जा निर्माण करतात. अननसाच्या गरामधे तंतुमय पदार्थ (फायबर) भरपूर प्रमाणात असल्यामुळे त्याच्या सेवनाने शरीराची पचनक्रिया व्यवस्थित राहून मलावष्टंभाचा त्रास होत नाही. अननसामध्ये ब्रोमेलिन नावाचे एन्झाईम असते.

### शरीर दाह

ते शरीराचा दाह आणि सूज कमी करते आणि घेतलेल्या अन्नाचे पचन करण्यास मदत करते. पिकलेले अननस मधुर, आंबट, मूत्रल, कृमिघ्न व पित्तशामक असते. यामुळे उष्णतेचे विकार व ऊन लागल्याने होणारे विकार कमी होण्यास मदत होते. प्रथिनयुक्त आहाराचे पचन होण्यासाठी अननसाचा उपयोग होतो, म्हणून प्रथिनयुक्त भोजनाच्या शेवटी अननस खाणे श्रेयस्कर असते.

उपयोग :

१) अननसामुळे उदरव्याधी, कावीळ, प्लीहावृद्धी, पित्तव्याधी, पंडुरोग (ॲनिमिया) यासारखे रोग बरे होतात.

२) बालके, तरुण, वृद्ध या सर्वांसाठी अननस उत्कृष्ट फळ आहे. जेव्हा पोटात कृमी-जंत होतात, तेव्हा अननस खाणे उत्तम असते. अननस कृमिनाशक आहे. पोटात दुखत असेल, तर अननसाच्या सेवनाने पोटदुखी कमी होते.

३) पित्तप्रकृतीच्या व्यक्तीसाठी अननस अत्यंत उपयुक्त आहे. पिकलेले अननस खाल्लयामुळे पित्त कमी होते आणि उष्णतेचे विकार कमी होतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सामुदायिक विवाहाची संकल्पना आज समाजात रुजविणे गरजेचे

## महापौर जोतीताई गाडे



कल्याण रोडवरील बालाजी, विठ्ठल–रुखमाई देवस्थानच्या वतीने बालाजी उत्सवात सामुदायिक विवाह झाला.

### कल्याण रोडवरील बालाजी, विठ्ठल–रुखमाई देवस्थानच्या बालाजी उत्सवात सामुदायिक विवाह

नगर – आज विवाह जुळवणे आणि ते पार पाडणे ही मोठी जिकरीची गोष्ट झाली आहे. मोठेपणा मिरविण्यासाठी अनेकजण अनावश्यक खर्च विवाह सोहळ्यात करत असतात. हौसेला मोल नसते. परंतु आज समाज वेगळ्या परिस्थितीतून जात आहे, अशा परिस्थितीत लग्नातील अनवश्यक खर्चास फाटा देत आज बालाजी उत्सवानिमित्त आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळा हा आदर्शवत असाच आहे. गेल्या १२ वर्षांपासून नळकांडे बंधू धार्मिक कार्याबरोबर सामाजिक प्रश्नांना प्राधान्य देत आहेत. वधू–वरांच्या पालकांचा खर्चाची बचत होऊन सामुदायिक विवाहाची संकल्पना आज समाजात रुजविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापौर जोतीताई गाडे यांनी केले.

कल्याण रोडवरील बालाजी, विठ्ठल–रुखमाई देवस्थानच्यावतीने बालाजी उत्सवात सामुदायिक विवाह झाले. याप्रसंगी आयोजक राम नळकांडे, माजी नगरसेवक शाम नळकांडे आदि परिवार उपस्थित होते.

महापौर गाडे म्हणाल्या कि सर्वधर्मिय सामुदायिक विवाह ही काळाची गरज आहे. महोत्सवातील धार्मिक कार्यक्रमाबरोबरच असा सामुदायिक विवाह सोहळ्याचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. अशा उपक्रमामुळे समाजाला दिशा मिळणार आहे. नळकांडे परिवाराचा यातील पुढाकार हा कौतुकास्पद असाच आहे.

याप्रसंगी संभाजी कदम, भगवान फुलसौंदर, संजय शेंडगे, गणेश भोसले, बाळासाहेब बोराटे, संदीप दातरंगे यांनीही बालजी महोत्सवानिमित्त सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगरसेवक शाम नळकांडे म्हणाले, दरवर्षी बालाजी महोत्सव हा विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमातून साजरा होत असतो. यात अहिल्यानगरसह परिसरातील नागरिक सहभागी होत असतात. गेल्या १२ वर्षांपासून या उत्सवात सर्वधर्मियांचा सामुदायिक विवाह सोहळ्यात ४६ विवाह लावण्यात येऊन वधू–वरांच्या पालकांना दिलासा देण्याचे काम करत आहोत. तसेच हा जो उत्सव पार पाडण्यासाठी आमच्या सर्व मित्र परिवार यांनी जे सहकार्य केले ते खरोखरच कोतुकस्पद असल्याचे त्यांनी सांगितले तसेच धार्मिक कार्यातून सामाजिक उन्नतीकडे असा हा आमचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले

या सामुदायिक विवाहाच्या अगोदर तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या विवाह सोहळ्याप्रसंगी संजय शेंडगे, संभाजी कदम, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, गणेश भोसले, संजय चोपडा, अमोल येवले, संतोष गेनपा, गणेश कवडे, सुरेश तिवारी, दत्ता कावरे, संदीप दातरंगे, महेश लोंढे, दगडू मामा पवार, नवनाथ कातोरे आदिंनी उपस्थित राहून वधू–वरांना आशिर्वाद दिले.

बालाजी सोसायटीचे अध्यक्ष राम नळकांडे यांनी प्रास्तविकात म्हणाले कि दरवर्षीप्रमाणे यंदाच्या बालाजी उत्सवांतर्गत धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम आयोजित केले होते. तसेच सामुदायिक विवाह सोहळा सर्वांचे आकर्षण ठरला, आज याठिकाणी वधू–वरांचे विवाह लावण्यात आले. या उपक्रमास नागरिकांचाप्रतिसाद मिळाला. त्यामुळे आमचा उत्साही वाढत असल्याचे सांगितले.

स्वागत नगरसेविका वैशाली नळकांडे यांनी केले. यावेळी मनिषा नळकांडे, सुरेखा नळकांडे, सुवर्णा नळकांडे, शारदा गडाख उपस्थित होते. सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले. रामा गुंडू यांनी आभार मानले. बालाजी उत्सव यशस्वीतेसाठी शंभुराजे प्रतिष्ठान, शिवाजीनगरचा राजा मित्र मंडळ, नवग्रह प्रतिष्ठान, शाम नळकांडे मित्र मंडळ व कल्याण रोड परिसरातील नागरिकांनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## होय होय वारकरी







'वारी' हा भगवद्भक्तिचा नुसता आविष्कार नसून भक्तिप्रेमाची अनुभूती घेण्याची ती सहज स्थिती आहे. साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांनी 'आषाढस्य प्रथम दिवसे' या पुस्तकात लिहिले आहे की 'महाराष्ट्राचा देव विठोबा. मोक्षपीठ पंढरपूर आणि आषाढी–कार्तिकीची वारी हाच महाराष्ट्राचा धर्म ! मराठी जनतेच्या जीवनात दोनच सण आहेत. एक आषाढी आणि दुसरा कार्तिकी! पण हे सण भोजनाचे नव्हेत तर भजनाचे आहेत. या दोन सणाचा अपूर्व सोहळा पंढरीस पाहायला मिळतो. चंद्रभागेच्या वाळवंटात विठ्ठलनामाचा प्रचंड बाजार भरलेला असतो.'

वैकुंठाचे सर्व 'केणे' तेथे ह्या दिवशी आलेले असते. कैवल्याच्या राशी येऊन पडतात. मोक्षाची पर्वणी होते. पंढरी ही महाराष्ट्रातल्या सर्व वारकऱ्यांची मिरास आहे.

'आमची मिरास पंढरी ।
आमुचे घर भीमातिरी।'

असे तुकाराम महाराज अभिमानाने सांगतात तर ज्ञानेश्वर माउली एक सुंदर रूपक मांडतात. एक माणूस वाटचाल करीत गावोगावी मुक्काम करीत आपल्या गावाला निघाला. एक मुक्काम संपला की आपले गाव एका मुक्कामाने जवळ आल्याचा आनंद त्याला व्हायचा. मुक्काम दर मुक्काम करीत एक दिवस त्याला असा अनुभव आला की आपण ज्या गावाला चाललोय तो गावच आपण होऊन गेलो आहे.

'येणे मार्गे जया ठाया जाईजे ।
तो गावो आपणचि होईजे ।
हे सांगों काय सहजे। जाणसी तू।।'

विठ्ठलाच्या गावाला जावं आणि अवघं विठ्ठलरूप व्हावं हेच खरं. परब्रह्माला साठवीत विवेकाच्या दिशेने होणारी उन्नत वाटचाल म्हणजे वारी. मानवी जीवनात परिवर्तनाच्या दिशेने पडणारे विवेकी पाऊल म्हणजे वारी. प्रत्येक क्रियेमध्ये साधन आणि साध्य ह्या दोन बाजू असतात. साधनेनेच साध्य गाठायचे असते. साधन आणि साधना खडतर आणि कठीण असते तर साध्य हे आनंदरूप. वारीच्या वाटचालीत साधन आणि साध्य दोन्हीही आनंदरूपच. ज्ञानरूप परमात्मा हे साध्य तर भक्तिरूप वाटचाल हे साधन. तुकोबाराय म्हणतात,

होय होय वारकरी।
पाहे पाहे रे पंढरी ।।
काय करावी साधने ।
फळ अवघेचि येणे ।।
तुका म्हणे डोळा।
विठो बैसला सावळा ।।

वारी हे भगवंताकडे नेणारे एकमेव साधन. अभिमान जावा, द्वैतभाव संपावा आणि केवळ भक्तिभाव उरावा हा अनुभव वारीत येतो. अद्वैताचे चिंतन तत्त्ववेत्ते करतात पण त्याचा अनुभव मात्र वारकरी घेतात. अद्वैताचा सामाजिक स्तरावर सामूहिक अनुभव घ्यायचा असेल तर एकदा तरी वारी करावी आणि घडावी.

**– किशोर गांधी**

# उद्योजक व कंपन्यांसाठी कार्यरत 'आमी' संघटनेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## उद्योगांच्या प्रश्नांवर एकजुटीचा निर्धार : अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांचे प्रतिपादन



आमी संघटनेच्या १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये बोलताना अध्यक्ष जयद्रथ खाकाळ.

नगर – उद्योजक व कंपन्यांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्यरत असलेल्या नगर एमआयडीसीतील आमी संघटनेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. आमी संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व जेष्ठ उद्योजक उपस्थित होते.

सभेप्रसंगी जनरल सचिव सागर निंबाळकर, सचिव प्रफुल्ल पारख, चिन्मय सुखटणकर, सहसचिव सतीश गवळी, खजिनदार सुमित लोढा, राजेंद्र कटारिया आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांनी संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेताना सांगितले की, उद्योजकांनी एकत्र येऊन आमी संघटनेची स्थापना केली. उद्योजकांनी एक छोटेसे रोपटे लावले होते, आज ते मोठे वटवृक्ष झाले आहे. उद्योगांचे प्रश्न सोडविणे, शासन–प्रशासनाशी संवाद साधणे आणि एमआयडीसीतील सुविधा सक्षम करणे, हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

एमआयडीसीमधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हा उद्योजकांचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. या विषयावर आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आणि अखेर हे काम पूर्ण झाले. कोरोनाकाळात शहराची गरज ओळखून आमी संघटनेच्या माध्यमातून ऑक्सिजन प्रकल्प सुरू करण्यात आला. हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श असल्याचे त्यांनी नमूद केले.

संघटनेच्या वतीने कंपन्यांसाठी एक हॉल उभारण्याचा ठराव घेण्यात आला होता. त्यानुसार आमी संघटनेच्या कार्यालयाचे काम पूर्ण करून स्व. अशोकराव सोनवणे यांच्या नावाने हॉलची उभारणी करण्यात आली. याच नव्या हॉलमध्ये संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. उद्योजकांची एकजूट हीच आपली खरी ताकद आहे. संघटनेच्या माध्यमातून काम करताना सर्वांची साथ मिळते, त्यामुळे उद्योगांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे पाठपुरावा करता येतो, असे खाकाळ यांनी सांगितले.

सभेचे प्रास्ताविक मिलिंद कुलकर्णी यांनी केले. मागील वर्षाचा आढावा उपाध्यक्ष चिन्मय सुखटणकर यांनी सादर केला. तर आर्थिक ताळेबंदाचे वाचन खजिनदार सुमित लोढा यांनी केले. सूत्रसंचालन सचिन पाठक यांनी केले. यावेळी जेष्ठ उद्योजक दौलत शिंदे, राजेश जगी, मिलिंद कुलकर्णी, संजय बंदिष्टी, गणेश कोलार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तसेच उद्योजकांना उत्कृष्ट यश मिळवल्या बद्दल अनेक पुरस्कार प्रदान होत असतात तर अशा उद्योकांना सन्मानित करण्यात आले आहे. उद्योगांच्या समस्या, एमआयडीसीतील सुविधा, उद्योजकांचे हित आणि भविष्यातील दिशा यावर त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. सभेच्या शेवटी संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी सर्व सदस्यांनी एकजुटीचा निर्धार व्यक्त केला.

# मराठा सोयरीकच्या कुटे दाम्पत्यांनी ५००० पेक्षा जास्त लग्न जमवून मोठे पुण्याचे कार्य केले : विजयकुमार ठुबे



मराठा सोयरीकच्या कुटे दाम्पत्यांनी ५००० पेक्षा जास्त लग्न जमविल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मराठा सेवा संघाचे इंजि. विजयकुमार ठुबे आदी.

### मराठा पतसंस्था व मराठा सोयरीक संस्थेचा आधुनिक वधु वर मेळावा

नगर – मराठा सोयरीक संस्थेच्या कुटे दाम्पत्यांनी त्यांच्या पाठीमागे कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसताना स्वकर्तुत्वावर त्यांनी मराठा सोयरीक संस्थेच्या माध्यमातून ५००० पेक्षा जास्त लग्न जमवले आहेत व त्यापैकी ५६७ विधवा विधुर व घटस्फोटीत यांचे जमवले आहेत, हे खूप मोठे पुण्याचे कार्य त्यांनी केले आहे असे असे उद्गार मराठा सेवा संघ महाराष्ट्राचे मार्गदर्शक व मराठा पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन इंजी. विजयकुमार ठुबे यांनी वधू वर मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी काढले.

या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून पत्रकार विठ्ठल लांडगे, शिक्षक संघाचे राष्ट्रीय संघटक संपतराव सोनवणे, पत्रकार बाजीराव खांदवे, शिवधर्म प्रचारक ज्ञानेश्वर अंभुरे, पतसंस्थेचे व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे, संचालक लक्ष्मण सोनाळे, ज्ञानदेव पांडुळे (मंत्री), ॲड. राजश्री शितोळे, सतीश इंगळे, उदय अनभुले, इंजि. संभाजी मते, द्वारकाधीश राजेभोसले, पारुनाथ ढोकळे, प्रा.डॉ.कल्पना ठुबे, अशोक वारकड, शशिकांत भांबरे, मनोज सोनवणे इत्यादी उपस्थित होते.

या मेळाव्यात ११७ मुलांची नोंदणी झाली तर ४१ मुलींची नोंदणी झाली. मेळाव्यात प्रा. डॉ. कल्पना ठुबे यांनी जिजाऊ वंदना म्हटली. चेअरमन विजयकुमार ठुबे यांनी सर्वांना हुंड्याबाबत व आई–वडील मुला मुलींच्या संसारात ढवळाढवळ करणार नाही अशी महत्त्वाची शपथ दिली.

मेळाव्याचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे सरांनी केले. संस्थेचे सल्लागार संपतराव सोनवणे यांनी आभार मानले.

पुढील मेळाव्याच्या माहितीसाठी ७०२०२८१२८२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेकडून करण्यात आले आहे.

# छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे १८ फेब्रुवारी रोजी जनजागृती पर कार्यक्रम




नगर – हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे १८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता जनजागृती पर शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या १७ वर्षांपासून स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटना आणि छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा उत्सव आयोजित केला जातो.

कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह शैक्षणिक, वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रातील उपस्थित राहणार आहेत.

यंदाचे महापौरपद ज्योती अमोल गाडे यांच्याकडे असून, गेल्या काही वर्षांपासून त्यांनी कष्टकरी शेतकरी चळवळीला सक्रिय पाठबळ दिले आहे. महापुरुषांच्या जयंती बाबतीत त्यांनी आराखडा तयार केला आहे त्यामुळे त्यांच्या भाषणाकडे विशेषतः विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या कामासाठी त्या निधी जाहीर करण्याची शक्यता असल्याने इतिहास प्रेमींमध्ये उत्सुकता आहे.

तसेच उपमहापौर जाधव हे देखील विद्यार्थी सहाय्यता केंद्रासाठी महत्त्वपूर्ण घोषणा करतील, अशी अपेक्षा आहे.

स्मायलिंग अस्मिता व छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समितीच्या दशक भरापासूनच्या विविध आंदोलनांच्या यशामुळे विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे काम नव्याने सुरू झाल्याने यंदाची शिवजयंती उत्साहात साजरी होणार आहे.

याप्रसंगी शिवप्रतिमेचे पूजन, शस्त्रकलेचे प्रात्यक्षिक तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१९ फेब्रुवारी शिवजयंतीच्या दिवशी शिवजन्माचा देखावा मिरवणूक संघटनेच्या वतीने काढण्यात येणार आहे. नगरकरांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रिनुल नागवडे, धिरज कुमटकर, शुभम पांडूळे, विशाखा भालेराव, निरज राजपुरे, विनोद जोंधळे हे परिश्रम घेत आहेत

# छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र भूषण पुरस्काराने कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी यांचा होणार सन्मान

## रतिलाल चौधर, तेजश्री थोरात आणि शितल मुगडे यांचा शिवजयंतीला होणार गौरव



नगर – पोलीस दलातील उत्कृष्ट कार्य, लोकसेवेच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल वालचंदनगर पोलीस स्टेशन (पुणे ग्रामीण) येथील पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर तसेच शहरातील कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांना छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी पाचव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात पोलीस दलातील या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा डोफ्लगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोफ्लगरे यांनी दिली.

पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर हे राष्ट्रपती पोलीस पदक विजेते अधिकारी असून सध्या ते पुणे जिल्हा तंटामुक्ती अभियानाचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय महात्मा फुले पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. तंटामुक्ती अभियानांतर्गत त्यांनी अनेक गावांतील वाद–संघर्ष संवादातून मिटवून सामाजिक सलोखा प्रस्थापित केला आहे. ग्रामसुरक्षा पथकाच्या माध्यमातून युवकांना सहभागी करून समाजप्रबोधन, गुन्हे प्रतिबंध आणि कायद्याविषयी जनजागृतीचे काम त्यांनी प्रभावीपणे केले आहे. गुन्हेगार प्रवृत्ती मूळापासून नष्ट करण्यासाठी तसेच गुन्हेगारांना सुधारण्याची संधी देऊन त्यांना योग्य मार्गावर आणण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात आणि पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे या अधिकारीही आपल्या कर्तव्यदक्षतेमुळे विशेष ओळख निर्माण करत आहेत. शहरातील महिला व मुलींच्या संरक्षणासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. महिला सुरक्षेबाबत जनजागृती, तक्रार निवारण, तातडीची कारवाई आणि कायदेशीर मार्गदर्शन या माध्यमातून महिलांना निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत.

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी, शाळा–महाविद्यालयांमध्ये जागरूकता कार्यक्रम आयोजित करून तरुणींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे पार पाडले आहे. या पोलिस दलातील अधिकाऱ्यांची समर्पित सेवाभावाची दखल घेत ग्रामीण मराठी साहित्य संमेलन संयोजन समितीच्या वतीने त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# प्रामाणिकपणे मेहनत करून व्यक्तिमत्व घडवून मोठे व्हा

## चंद्रचूड गोंगले यांचे आवाहन



हिंदसेवा मंडळाच्या श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयात इयत्ता १०वी च्या विद्यार्थिनींचा सदिच्छा समारंभ पार पडला. या प्रसंगी विद्यालयामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले उपस्थित होते.

नगर – आपल्या जीवनामध्ये प्रामाणिकपणे मेहनत करून ध्येय निश्चित केले व त्या दिशेने वाटचाल केली तर यश नक्कीच मिळते व चांगले व्यक्तिमत्त्व घडते. त्याबरोबर विचारशुद्धी, आचारशुद्धी बाळगली पाहिजे. शालेय क्रमीत पुस्तकांबरोबर इतर अवांतर पुस्तकाची गोडी निर्माण केली पाहिजे. त्याबरोबर आध्यात्मिक बैठकीचेही महत्त्व त्यांनी पटवून दिले, तसेच विद्यार्थी दशेत मोबाईल व टीव्हीचा जरुरी पुरता वापर माहिती करताच करावा. तसेच शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक प्रगती ही विद्यार्थी दशेत करून घ्यावी. समाजाला देण्याची प्रवृत्ती अंगी ठेवावी व आपला उत्कर्ष करून घ्यावा, असे आवाहन सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी केले.

हिंदसेवा मंडळाच्या श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयात इयत्ता १०वी च्या विद्यार्थिनींचा सदिच्छा समारंभ पार पडला. या प्रसंगी विद्यालयामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रचूड गोंगले उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थिनींना सखोल असे मार्गदर्शन केले. मार्गदर्शनाबरोबर न्या. चंद्रचूड गोंगले यांनी विद्यार्थिनींना शिक्षणामध्ये मदत व्हावी म्हणून बंधू कै. चंद्रशेखर गोंगले यांचे स्मरणार्थ परिवारातर्फे शाळेला ११,००० रू. ची देणगी दिली.

याप्रसंगी विद्यालयाच्या स्कूल कमिटीच्या सदस्या सौ. सायलीताई खराडे अध्यक्षस्थानी होत्या. तसेच प्रमुख पाहुण्या म्हणून बालक मंदिर महीला मंडळ या शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ. अस्मिता शूळ व सौ. चित्रा गोंगले या उपस्थित होत्या.

मुख्याध्यापिका सौ. रोहिणी फळे, जेष्ठ शिक्षक बबन धनवडे, वृषाल एकबोटे, सुखदेव नागरे, नितीन केने, जेष्ठ शिक्षिका सौ. वैशाली दारवेकर, सौ. अनघा देवचक्के, सौ. माहेश्वरी कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त करून दहावीच्या विद्यार्थिनींना मनापासून शुभेच्छा दिल्या. शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# श्री आनंदेश्वर महादेव मंदिरात शिव-पार्वती विवाह सोहळा उत्साहात

## मंत्रमुग्ध करणारी वरात, भस्माची उधळण; भाविकांची उसळलेली गर्दी, 'शिवलीलामृत' पारायण व 'ॐ नमः शिवाय' जपाने परिसर भक्तीमय



स्टेशन रोड येथील स्वामी अपार्टमेंटसमोरील श्री आनंदेश्वर महादेव व दत्त मंदिर परिसरात भगवान शंकर आणि पार्वती देवीचा विवाह सोहळा भक्तीभाव आणि उत्साहात झाला.

नगर – महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वाच्या पार्श्वभूमीवर स्टेशन रोड येथील स्वामी अपार्टमेंटसमोरील श्री आनंदेश्वर महादेव व दत्त मंदिर परिसरात भगवान शंकर आणि पार्वती देवीचा विवाह सोहळा भक्तीभाव आणि उत्साहात झाला. पारंपरिक वेशभूषा, ढोल–ताशांचा गजर, हर–हर महादेवच्या जयघोषात निघालेली शिव–पार्वतीची वरात आणि विवाह सोहळ्याला लाभलेली भाविकांची उपस्थिती यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

शिव–पार्वतीच्या विवाह सोहळ्यात लहान मुलांनी विविध पौराणिक वेशभूषा परिधान करून सहभाग नोंदविला. कोणी नंदी, तर कोणी शिवगणांच्या वेशात दिसत होते. भस्माची उधळण करीत आणि हर हर महादेवच्या घोषणांनी दुमदुमलेल्या वातावरणात वरात परिसरातून मार्गक्रमण करत मंदिरात दाखल झाली. या सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ व महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार मागील काही दिवसांपासून 'शिवलीलामृत' पारायण सोहळा तसेच 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा अखंड जप सुरू होता. दररोज सकाळ–संध्याकाळ महिला मंदिरात एकत्र येऊन सामूहिक जप करत होत्या. पारायणामुळे मंदिर परिसर भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणाने भारावून गेला होता.

१५ फेब्रुवारी रोजी पहाटे ६ वाजता भगवान शिवाची विधिवत अभिषेक पूजा करण्यात आली. पंचामृत, बिल्वपत्र, दुग्ध आणि गंगाजल अर्पण करून महादेवांची आराधना करण्यात आली. त्यानंतर सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. विवाह सोहळ्यात पारंपरिक पद्धतीने मंत्रोच्चार, मंगळाष्टक आणि फुलांची उधळण करण्यात आली. उपस्थितांनी टाळ्या, घोषणांनी आणि फटाक्यांच्या आतषबाजीने आनंद व्यक्त केला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाल्या होत्या.



पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधाकृष्ण मंदिरात महाशिवरात्री साजरी करण्यात आली.

# सर्जेपूरा मधील राधाकृष्ण मंदिरात महाशिवरात्री साजरी

नगर – सर्जेपूरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधाकृष्ण मंदिरात महाशिवरात्री भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. महादेवाच्या जयघोष करत शीख, पंजाबी समाजातील भाविकांनी दर्शनासाठी हजेरी लावली होती. सकाळी मंदिरातील शिवलिंगाचा अभिषेक करुन विधीवत पूजा करण्यात आली. ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता, विश्वस्त व भाविकांच्या हस्ते महादेवाची आरती पार पडली. यावेळी भाविक व महिला वर्ग उपस्थित होत्या.

भक्तीमय वातावरणात भजन मंडळीच्या वतीने भजन–कीर्तनाचा कार्यक्रम देखील रंगला होता. हर हर महादेवाच्या जय जयकाराने मंदिर परिसर दुमदुमून गेले. शाबुदाणा खिचडी व थंडाई प्रसादाचे वाटप करुन या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे सर्व विश्वस्त व समाजातील युवकांनी परिश्रम घेतले.




श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्र निमित्त करण्यात आली आकर्षक फुलांची सजावट.

# श्री ओंकारेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्र निमित्त फुलांची सजावट

नगर – दाळ मंडई येथील तिळवण तेली समाज ट्रस्ट च्या वतीने महाशिवरात्र निमित्त ओंकारेश्वर मंदिर येथे अभिषेक करून आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. तसेच श्रावण महिन्यातील प्रत्येक श्रावणी सोमवारी असेच वेगवेगळ्या पद्धतीने महादेवाची पूजा करून सजावट करण्यात येत आहे असे ट्रस्टचा अध्यक्षा सौ. नीता लोखंडे यांनी सांगितले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्षा सौ. नीता लोखंडे, उपाध्यक्ष शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सेदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, मनोज क्षीरसागर आदी उपस्थित होते. सर्व बंधू–भगिनींनी दर्शनाचा लाभ घेतला प्रत्येक सोमवारी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी ओंकारेश्वर महादेवाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे तेव्हा पासून मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत आहे. तसेच तिळवण तेली समाज ट्रस्टच्या वतीने प्रत्येक सण–उत्सव आनंदाने साजरे केले जातात.

# तपेश्वर मंदिरात बेलवृक्ष लागवड करुन स्वच्छता अभियान

## 'बम बम भोले'च्या जयघोषात पर्यावरण संवर्धनाचा संदेश; खिचडी व फळांचे वाटप

नगर – भिंगार येथील तपेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त हर दिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने 'बम बम भोले'च्या गजरात मंदिरासमोरील परिसरात बेलाच्या झाडाची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यानंतर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. मंदिर परिसरात स्वच्छता करून प्लास्टिकमुक्तीचा संदेश देण्यात आला. स्वच्छ मंदिर, स्वच्छ परिसर आणि हरित वातावरण या संकल्पनेवर भर देत उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाचे आवाहन करण्यात आले.



भिंगार येथील तपेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्रीनिमित्त हर दिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने 'बम बम भोले'च्या गजरात मंदिरासमोरील परिसरात बेलाच्या झाडाची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर शिवलिंगाची विधीवत पूजा करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. बेलवृक्ष हे भगवान शिवाला अत्यंत प्रिय मानले जाते. त्यामुळे धार्मिक परंपरेला पर्यावरणाची जोड देत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. या अभियानात तपेश्वर महादेव मंदिराचे सर्व पदाधिकारी तसेच हरी ओम भजनी मंडळ (भिंगार) येथील महिला देखील सहभागी झाल्या होत्या.

कार्यक्रमास ह.भ.प. माया गोरखे, प्रांजली सपकाळ, सुनिताताई वराडे, संगीता सपकाळ, उषाताई ठोकळ, मीना ससाणे, ह.भ.प. रेखाताई मडावी, संगीता दरवडे, गीतांजली धाडगे, सरिता शिंदे, सुरेखा कारडामे, हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, जहीर सय्यद, सुंदर पाटील, दिलीप ठोकळ, सर्वेश सपकाळ, सचिन चोपडा, विलास आहेर, राजेंद्र चंगेडिया, ह.भ.प गोकुळ धाडगे, रतन मेहेत्रे, अभिजीत सपकाळ, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, दिलीप गुगळे, ईवान सपकाळ, अशोक दळवी, अशोक पराते, अविनाश जाधव, मच्छिंद्र बेरड, डॉ. अतुल मडावी, सुभाष होडगे, नंदू नायकू, मुन्ना वाघस्कर, राजू कांबळे, रामनाथ गर्जे, शशिकांत पवार, विशाल भामरे, योगेश चौधरी आदी उपस्थित होते.

हर दिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ म्हणाले की, महाशिवरात्री हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो आत्मशुद्धी आणि समाजसेवेचा संदेश देणारा दिवस आहे. भगवान शिवाला प्रिय असलेला बेलवृक्ष लावून आम्ही पर्यावरण संवर्धनाची छोटी पण महत्त्वाची सुरुवात केली आहे. आजच्या काळात प्रदूषण, प्लास्टिकचा वाढता वापर आणि पर्यावरणाचा ऱ्हास ही गंभीर समस्या बनली आहे. प्रत्येकाने वर्षातून किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन केले तर भविष्यातील पिढ्यांसाठी आपण हिरवेगार भविष्य घडवू शकतो. मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. धर्म आणि पर्यावरण यांची सांगड घालत समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

गोकुळ धाडगे म्हणाले की, भगवान शिव हे निसर्गाचे अधिष्ठाता देव आहेत. त्यांच्या पूजेत बेलपत्राचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे बेलवृक्ष लागवड हा केवळ धार्मिक विधी नसून पर्यावरण संवर्धनाची प्रतिज्ञा आहे. स्वच्छता हीच खरी सेवा आहे. मंदिर परिसर स्वच्छ असेल तर भाविकांना समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. अशा उपक्रमांमधून सामाजिक जाणीव निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



महाशिवरात्री निमित्त अयप्पा स्वामी मंदिरात भक्तिमय वातावरणात रुद्राभिषेक करण्यात आला. अयप्पा सेवा समितीच्या वतीने आयोजित या धार्मिक सोहळ्यात केरळसह शहरातील भाविक सहभागी झाले होते.

# अयप्पा स्वामी मंदिरात रुद्राभिषेक पूजेने महाशिवरात्र साजरी

नगर – महाशिवरात्री निमित्त शहरातील अयप्पा स्वामी मंदिरात रुद्राभिषेक व विविध पूजाविधी भक्तिमय वातावरणात झाल्या. हर हर महादेवच्या गजरात आणि वेदो मंत्रोच्चारात भगवान शंकरांची विधीवत पूजा करण्यात आली. अयप्पा सेवा समितीच्या वतीने आयोजित या धार्मिक सोहळ्यात केरळसह शहरातील भाविक सहभागी झाले होते. अयप्पा सेवा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सोहळ्याचे नियोजन केले.

महाशिवरात्रीनिमित्त अयप्पा स्वामी मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसेच समया प्रज्वलित करण्यात आल्या होत्या. सायंकाळी सूर्यास्तानंतर मंदिरात रुद्राभिषेकास प्रारंभ झाला. यावेळी पुरोहितांनी गणेशपूजन व पुण्याहवाचन, कलश स्थापना, षोडशोपचार पूजन आणि रुद्रपठण केले. तसेच शिवलिंगावर गंगाजल, पंचामृत व ऊसाचा रस अर्पणकरून रुद्राभिषेक केला. बिल्वपत्र, पुष्प व पुष्पमाला अर्पण करून महाआरतीने पूजाविधी झाली. उपस्थित भाविकांना भस्म व उसाच्या रसाचा प्रसाद देण्यात आला.

यावेळी उपस्थित भाविकांनी मनोभावे रुद्राभिषेक पूजेचे दर्शन घेतले. स्वामी ये शरणं अयप्पा असा जयघोष तसेच ॐ नमः शिवाय चा जप भाविकांनी केला. मंदिरांतील अयप्पा स्वामी, सरस्वती देवी व सिद्धिविनायक गणेशाचीही यावेळी विशेष पूजा करण्यात आली.

# महाशिवरात्रीच्या पावन दिनी भजन, ध्यान व मंत्र जपाचा दिव्य अनुभव

## साक्षी मुनोत यांचे प्रतिपादन

नगर – महाशिवरात्रीच्या पावन दिनी शिवपार्वतीचा सोहळा झाला होता. महाशिवरात्रीच्या दिवशी शिव आराधना केल्यास सुख, समाधान व शांती लाभते. भजन आणि जागरण केल्यास भगवान शिव प्रसन्न होतात. धावपळीच्या युगात प्रत्येकाला ताणतणाव जाणवत असतो. या ताणतणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी व मन शांती मिळविण्यासाठी ध्यान धारणेची आवश्यकता आहे. शिव आराधना केल्याने नकारात्मक ऊर्जा नष्ट होऊन जीवनात सकारात्मकता येते. महाशिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त महादेवाच्या सानिध्यात आत्म शुद्धीचा पवित्र स्पर्श करणारा भजन, ध्यान व मंत्रजापाचा दिव्य अनुभव मिळतो, असे प्रतिपादन द मिस्टिक आय च्या संचालिका साक्षी मुनोत यांनी केले आहे.



महाशिवरात्री निमित्त द मिस्टीक आय या संस्थेमार्फत शिवोहम ध्यान शिबिराचे व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिपप्रज्वलन करुन भजन संध्या व ध्यान शिबिराचे उद्घाटन प्रमुख अतिथी लालचंद मुनोत यांच्या हस्ते करण्यात आला.

## शिवोहमभजन संध्येतून शिव आराधना व ध्यान साधना शिबिरास प्रतिसाद

केशर गुलाब मंगल कार्यालय येथे महाशिवरात्री निमित्त द मिस्टीक आय या संस्थेमार्फत शिवोहम ध्यान शिबिराचे व भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिपप्रज्वलन करुन भजन संध्या व ध्यान शिबिराचे उद्घाटन प्रमुख अतिथी लालचंद मुनोत, सौ. सुकांता मुनोत, आनंदराम मुनोत, सौ.कमल मुनोत, साक्षी मुनोत आदींच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भजन संध्येत शिवस्तुती, शिवतांडव, मन मेरा मंदिर, शिव मेरी पूजा... या भजनसंध्ये च्या कार्यक्रमातून शिव आराधना करण्यात आली. यावेळी साधक भजनामध्ये तल्लीन होऊन मंत्रमुग्ध झाले.

भजन संध्येच्या कार्यक्रमात गायक राजेंद्र टाक व सौ.मधुवंती धर्माधिकारी यांनी शिव भजने गायीली. तर यावेळी साथसंगत तबला वादक हर्षद भावे, किबोर्ड–गणेश धर्माधिकारी, आक्टोपेड –रमेश कराळे यांनी साथसंगत दिली.



महाशिवरात्रीनिमित्त स्वामी ग्रुपच्या अहिल्यानगर ते पारनेर मधील १२ ज्योतिर्लिंग महादेवाच्या दर्शन यात्रेने हर हर महादेवाच्या जयघोषात प्रस्थान केले.

# यमाई - तुकाई - चामुंडा माता मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त १९ फेब्रुवारी पासून विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

नगर – बुऱ्हाणनगर तुळजाभवानी मंदिरा मागे असलेल्या यमाई–तुकाई–चामुंडा मातेच्या नवनिर्मित मंदिरामध्ये मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे १९ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा. अघोर पूजा हवन होणार असून २० फेब्रुवारी रोजी दु. ३ वा. शोभायात्रा काढण्यात येणार आहे. २१ व २२ फेब्रुवारीला सकाळी ९ वाजता नवीन मुर्ती प्राणप्रतिष्ठा, कळस पुजन व होमहवन होईल. २३ फेब्रुवारीला ११ ते ३ या वेळेत महाप्रसाद होईल. भाविकांनी कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चंद्रशेखर राणा, सुभाष राणा (मो.९२७१५४०००८), शिवम राणा (९२८४७४३००३) यांनी केले आहे.

# अहिल्यानगर शहरामध्ये १९ फेब्रुवारी रोजी अखंड स्वर ताल यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन

नगर – श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या वतीने डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि डॉ. मधुसूदन बोपर्डीकर यांच्या पुण्य स्मरणार्थ शास्त्रीय संगीताचा बारा तासांचा अखंड स्वरतालयज्ञ आयोजित करण्यात आला आहे. नगरमधे शास्त्रीय संगीताच्या जतन आणि संवर्धनाचे कार्य या दोघा दिग्गजांनी अनेक वर्षे केले. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत कलांगण हॉल, गीतायन, गुलमोहोर रोड येथे सदर कार्यक्रम होईल. या कार्यक्रमात नगर मधील कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

प्रथम सत्रात सकाळी ९ वाजता वेदांत कुलकर्णी, डॉ. हृषिकेश कुलकर्णी, गायत्री धनलगडे हे गायन, स्मिता राणा या सतार वादन तर प्रशांत थोरात आणि सुपर्ण प्रताप हे स्वतंत्र तबला वादन सादर करतील. दुसऱ्या सत्रात दुपारी २ वाजता माधवी ऋषी, अनुजा कुलकर्णी, रिद्धी कुलकर्णी, प्रतीक्षा काळे, अंकित पवार हे गायन तर विराज लवांडे आणि अनुज दरवडे हे स्वतंत्र तबला वादन सादर करतील. तिसऱ्या सत्रात महेश खोपटीकर, डॉ.धनश्री खरवंडीकर, ओंकार देऊळगांवकर, संपदा चौधरी, किरण जोशी हे गायन, मकरंद खरवंडीकर हे स्वतंत्र हार्मोनियम वादन आणि शेखर दरवडे हे स्वतंत्र तबला वादन सादर करतील.

हा कार्यक्रम म्हणजे शास्त्रीय संगीताच्या साधकांसाठी आणि रसिकांसाठी एक पर्वणी आहे, त्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रुती संगीत निकेतनच्या सर्व पदाधिकारी आणि ज्येष्ठ संगीत तज्ञ कुमुदिनी बोपर्डीकर यांनी केले आहे.

# हर हर महादेवाच्या जयघोषात १२ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा

नगर – महाशिवरात्रीनिमित्त अहिल्यानगर ते पारनेर मधील १२ ज्योतिर्लिंग महादेवाच्या दर्शन यात्रा भक्तिपूर्ण वातावरणात झाली. रविवारी सकाळी हर हर महादेवाच्या जयघोषात या यात्रेने दिल्लीगेट येथील कुबेर गणपती मंदिरापासून प्रस्थान केले. गेल्या २९ वर्षांपासून शहरातील स्वामी ग्रुपच्या वतीने या यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.


पारनेर मधील १२ ज्योतिर्लिंग महादेवाचे मंदिर प्रतिकाशी म्हणून प्रसिद्ध आहे. नगरचे भरत बोरुडे हे दरवर्षी महाशिवरात्रीला या यात्रेचे आयोजन करत आहेत. शहरातील शेकडो भाविक हातात भगवे झेंडे घेत यामध्ये उत्स्फूर्त सहभागी झाले.

यात्रेबद्दल माहिती देताना भरत बोरुडे म्हणाले, गेल्या २९ वर्षांपासून अखंडितपणे या यात्रेचे आयोजन करत आहोत. शेकडो शिवभक्त यामध्ये उत्साहात सहभागी होत आहेत. या यात्रेत प्रथम सेनापती बापट यांना प्रसन्न असलेल्या गणेश खिंडीतील भालचंद्र गणपतीचे दर्शन घेतल्यावर पराशर ऋषींनी तपश्चर्या केल्यावर प्रगट झालेल्या या १२ ज्योतिर्लिंग महादेवाच्या मंदिराचे व पराशर ऋषींच्या समाधीचे दर्शन भाविक घेतात.

चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी म्हणाले, शिवभक्त भारत बोरुडे यांच्या या यात्रेत गेल्या १० वर्षांपासून चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे कार्यक्रम सहभागी होत आहेत. महाशिवरात्री सारख्या पवित्र दिवशी १२ ज्योतिर्लिंगांचे दर्शन होणे हे आमचे भाग्य आहे.

# अर्थजगत

# वैयक्तिक कर्ज मुदतीपूर्वी बंद करणे फायद्याचे की तोट्याचे



अनेकदा वैयक्तिक कर्ज घेतल्यानंतर काही हप्ते भरले की, ते कर्ज लवकरात लवकर संपवण्याची ओढ लागते आणि हातात थोडा जादा पैसा आला की लोक लगेच बँक गाठतात. मात्र, कर्ज मुदतीपूर्वी बंद करणे किंवा ज्याला तांत्रिक भाषेत 'फोरक्लोजर' म्हणतात, हा निर्णय नेहमीच फायद्याचा सौदा नसतो.

कर्ज बंद करण्याचा निर्णय केवळ तुमच्या इच्छेवर नाही, तर तुमच्या खिशावर होणाऱ्या प्रत्यक्ष आर्थिक परिणामावर आधारित असायला हवा. कर्ज फेडण्याच्या घाईत अनेकदा लोक अनावधानाने स्वतःचे आर्थिक नुकसान करून घेतात.

कर्ज प्री-पे किंवा फोरक्लोज करण्यापूर्वी 'कॉस्ट इम्पॅक्ट' म्हणजेच खर्चाचा परिणाम समजून घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. अनेक कर्जदार फक्त कर्ज संपवण्याकडे लक्ष देतात, पण वेळेनुसार व्याजाचे गणित कसे बदलते हे ते विसरतात. उदाहरणार्थ, जर तुम्ही पाच वर्षांसाठी कर्ज घेतले असेल आणि तिसऱ्या वर्षी ते बंद करण्याचा विचार करत असाल, तर हा एक समंजस निर्णय ठरू शकतो कारण अद्याप व्याजाची मोठी रक्कम वाचवणे शक्य असते. याउलट, जर कर्जाची मुदत संपायला केवळ सहा महिने किंवा एक वर्ष उरले असेल, तर ते बंद करण्याची धावपळ बहुधा निष्फळ ठरते.

याचे कारण असे की, कर्जाच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये हप्त्याचा मोठा हिस्सा व्याज फेडण्यासाठी जातो, तर शेवटच्या महिन्यांपर्यंत तुम्ही जवळपास सर्व व्याज आधीच भरलेले असते. अशा वेळी बँकेला फोरक्लोजर शुल्क देणे तुमच्यासाठी तोट्याचे ठरू शकते.

याव्यतिरिक्त, मुदतीपूर्वी कर्ज फेडताना लागणाऱ्या लपलेल्या खर्चांकडे लक्ष देणे अनिवार्य आहे. बँका अनेकदा तीन ते चार टक्के फोरक्लोजर शुल्क आकारतात, परंतु त्यावर लागणारा १८ टक्के जीएसटी लोक मोजायला विसरतात. अभिषेक गांधी एक गणित मांडतात की, जर तुम्ही २ लाख रुपयांचे कर्ज मुदतीपूर्वी फेडत असाल आणि त्यावर ३ टक्क्यांनुसार ६,००० रुपये शुल्क लागत असेल, तर त्यावर १,०८० रुपये जीएसटी देखील द्यावा लागेल. जर कर्ज लवकर बंद केल्यामुळे तुमची व्याजातील निव्वळ बचत केवळ ५,००० रुपये होत असेल, तर प्रत्यक्षात तुम्ही खिशातून जास्त पैसे भरत आहात. म्हणूनच नेहमी 'नेट सेविंग्स'चा हिशोब लावूनच पुढचे पाऊल उचलले पाहिजे.

पूर्ण कर्ज एकाच वेळी बंद करण्याऐवजी 'पार्शियल प्री-पेमेंट' म्हणजेच आंशिक मुद्दल फेड हा देखील एक उत्तम पर्याय ठरू शकतो. ऑफिसमधून बोनस मिळाला असेल किंवा इतर मार्गांनी पैसे आले असतील, तर ती सर्व रक्कम कर्ज बंद करण्यासाठी न

## माहीत आहे?

वापरता मुद्दल कमी करण्यासाठी वापरावी. यामुळे तुमची थकबाकी कमी होते आणि भविष्यातील हप्त्यांवर लागणारे व्याजही घटते. या रणनीतीचा मोठा फायदा तुमच्या क्रेडिट स्कोरशी जोडलेला आहे. कर्ज एकदम बंद केल्याने ती 'क्रेडिट लाईन' संपते, परंतु कर्ज सक्रिय ठेवून मोठा हिस्सा फेडल्याने तुमची 'क्रेडिट एज' टिकून राहते. जे ग्राहक शिस्तीने आणि प्रदीर्घ काळ कर्ज परतफेड करतात, त्यांना क्रेडिट ब्युरो अधिक पसंती देतात.

कर्जफेडीच्या प्रक्रियेत होणारी सर्वात मोठी आणि सामान्य चूक म्हणजे अपूर्ण कागदपत्रे होय. जोपर्यंत तुमचे कर्ज बँक रेकॉर्डमध्ये पूर्णपणे क्लिअर होत नाही, तोपर्यंत ती प्रक्रिया अपूर्णच असते. अनेकदा एखादा छोटा थकीत चार्ज, जसे की ईएमआय बाऊन्स फी किंवा इतर किरकोळ व्याजाचे २००-५०० रुपये शिल्लक राहतात आणि हेच भविष्यात मोठ्या संकटाचे कारण बनू शकतात. जोपर्यंत तुम्ही बँकेकडून 'नो ड्यूज सर्टिफिकेट' मिळवत नाही, तोपर्यंत तांत्रिकदृष्ट्या ते कर्ज खाते उघडेच मानले जाते. ही छोटी रक्कम तुमच्या सिबिल रिपोर्टवर 'डिफॉल्ट' म्हणून दिसू शकते, ज्यामुळे तुमचा क्रेडिट स्कोर खराब होतो. त्यामुळे कर्ज संपल्यानंतर बँकेकडून भौतिक किंवा डिजिटल स्वरूपात एनडीसी घेणे आणि क्रेडिट ब्युरोमध्ये तशी नोंद झाली आहे याची खात्री करणे, हेच खऱ्या अर्थाने यशस्वी कर्जमुक्तीचे लक्षण आहे.



## गुंतवणुकीसाठी सोन्या-चांदीचा विचार करताना

# पारंपरिक दागिने की ईटीएफ

**अक्षय तृतीया असो वा दिवाळी, भारतीय कुटुंबांमध्ये सोने-चांदी खरेदीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पण दरवेळी त्यांची खरेदी करताना सराफाच्या दुकानात जाणे, गर्दीत थांबणे, घडणावळीच्या खर्चाबाबत चौकशी करणे, विकताना किती घट होणार याची चौकशी करणे अशा अनेक गोष्टी कराव्या लागतात. इतके करूनही खरेदीनंतर ते सुरक्षित ठेवावे लागते. अनेकदा या सुरक्षेच्या काळजीने दडपणही येते. दुसरीकडे, तंत्रज्ञानाच्या युगात आता तुम्ही घरात बसून आपल्या मोबाईलवरून 'गोल्ड किंवा सिल्वर ईटीएफ' खरेदी करू शकता. यामध्ये शुद्धतेची चिंता नाही, मजुरीचे शुल्क नाही आणि साठवणुकीचीही कटकट नाही. एसआयपीद्वारे दरमहा केवळ १००० रुपयांची शिस्तबद्ध गुंतवणूक करून तुम्ही सोन्या-चांदीची मालमत्ता उभी करू शकता.**

नाणी किंवा दागिने खरेदी करताना मेकिंग चार्जेस, हॉलमार्किंग शुल्क आणि जीएसटी यांमुळे गुंतवणुकीचे मूल्य सुरुवातीलाच कमी होते. प्रत्यक्ष सोने विकायला गेल्यावर शुद्धतेवरून होणारी घासाघीस आणि मिळणारी किंमत यामुळे अपेक्षित नफा कमी होऊ शकतो.

## जाणून घ्या

'ईटीएफ' म्हणजे शेअर बाजारात व्यवहार होणारे फंड. उदाहरणार्थ, 'निप्पॉन इंडिया ईटीएफ गोल्ड बीज' हा फंड सोन्याच्या किमतीनुसार चालतो. तशाच प्रकारे चांदीसाठीही 'सिल्व्हर ईटीएफ' उपलब्ध आहेत. फायदे: यात मजुरीचे शुल्क नसते. तुम्ही थेट बाजारभावाने युनिटस् खरेदी करू शकता. सर्व व्यवहार डीमॅट स्वरूपात असल्याने लॉकरची गरज नाही. शेअर बाजाराच्या वेळेत तुम्ही कधीही याची विक्री करून पैसे मिळवू शकता.

एसआयपीचा फायदा म्हणजे केवळ सोन्याचे भाव वाढण्याची वाट पाहण्यापेक्षा, दरमहा ठराविक रक्कम गुंतवणे अधिक फायदेशीर ठरते.

परताव्याचे अर्थगणित

सोन्यातील गुंतवणूक (जानेवारी २०२० ते नोव्हेंबर २०२५): दरमहा गुंतवणूक: १००० रुपये

एकूण गुंतवणूक: ७१,००० रुपये

नोव्हेंबर २०२५ मधील किंमत: १०४.५१ रुपये (प्रति युनिट)

गुंतवणुकीचे अंतिम मूल्य: अंदाजे १,४८,७९५ रुपये

मिळालेला परतावा: सुमारे १०९% (वार्षिक सरासरी १५.३%)

### चांदीतील गुंतवणूक (जानेवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२५):

**एकूण गुंतवणूक:** ४७,००० रुपये

**गुंतवणुकीचे अंतिम मूल्य:** अंदाजे ९७,६१९ रुपये

**मिळालेला परतावा:** सुमारे १०८% (वार्षिक सरासरी १७-१८%)

या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, बाजारातील चढ-उतारांची चिंता न करता केलेली छोटी गुंतवणूक दीर्घकाळात मोठी संपत्ती निर्माण करू शकते.

लग्नकार्यासाठी दागिने घडवणे योग्य असले, तरी केवळ 'गुंतवणूक' म्हणून पाहिल्यास दागिने हा महागडा पर्याय ठरतो. तुमचा उद्देश फक्त संपत्ती वाढवणे हा असेल, तर 'ईटीएफ' हा सर्वात पारदर्शक आणि स्वस्त मार्ग आहे.



# तुमच्या पैशांचे मूल्य कसे कमी होत जाते?

आजच्या १०० रुपयांचे मूल्य पुढच्या वर्षी तितकेच नसेल, हे तुम्हाला माहीत आहे का?

महागाईचा हा सुप्त परिणाम आपल्या खिशावर सतत होत असतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, महागाई म्हणजे काळाच्या ओघात पैशाची खरेदीशक्ती कमी होण्याची प्रक्रिया होय. उदाहरणार्थ, जर आज एक लिटर दूध ५० रुपयांना मिळत असेल आणि महागाईचा दर ६% असेल, तर पुढच्या वर्षी त्याच दुधासाठी तुम्हाला ५३ रुपये मोजावे लागतील. याचाच अर्थ, जर तुमचा पैसा विनावापर पडून राहिला, तर दरवर्षी त्याची किंमत कमी होत जाते.

आता कृती करण्याची गरज का आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जर तुमची बचत साध्या बचत खात्यात (सेव्हिंग्स अकाउंट) असेल आणि त्यावर केवळ ३-४% व्याज मिळत असेल, तर महागाई त्यातला मोठा हिस्सा फस्त करते. गेल्या दशकात भारतातील सरासरी महागाई दर ४ ते ७% दरम्यान राहिला आहे. त्यामुळे गुंतवणूक न केल्यास तुमच्या पैशाचे मूल्य दररोज कमी होत आहे. एक वास्तव तपासायचे झाले तर, १० वर्षांपूर्वी ज्या कुटुंबाचा महिन्याचा किराणा ७,००० रुपयांत होत होता, ६% महागाई दराने आज त्याच किराण्यासाठी १२,५०० रुपयांहून अधिक खर्च करावा लागत आहे.

तुमच्या पैशांचे रक्षण करण्यासाठी काही स्मार्ट मार्ग अवलंबणे गरजेचे आहे. दीर्घकाळात महागाईवर मात करण्यासाठी इक्विटी म्हणजेच शेअर्स आणि म्युच्युअल फंड हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. भारतीय शेअर बाजार वार्षिक सरासरी १०-१२% परतावा देतो, जो महागाई दरापेक्षा कितीतरी जास्त आहे. यासोबतच, केवळ बचत खात्यावर अवलंबून न राहता 'डेट म्युच्युअल फंड' किंवा आवर्ती ठेव (R¦) यांसारख्या साधनांमध्ये विविधता आणावी, जिथे बचत खात्यापेक्षा थोडे जास्त उत्पन्न मिळू शकते.

सोन्यातील गुंतवणूक हा देखील महागाईच्या काळात एक उत्तम आधार ठरतो. जेव्हा महागाई वाढते, तेव्हा सोन्याचे दरही वाढतात. मात्र, प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याऐवजी डिजिटल गोल्ड, गोल्ड ईटीएफ किंवा सॉव्हरिन गोल्ड बाँडचा विचार करणे सोयीचे ठरते. तसेच रिअल इस्टेटमधील मालमत्तेचे मूल्यही महागाईसोबत वाढत असल्याचे दिसून येते. आज केलेली योग्य गुंतवणूक म्हणजे उद्याच्या जीवनशैलीची सुरक्षितता आहे. केवळ पैसा साठवून न ठेवता, तो योग्य ठिकाणी गुंतवून वाढवणे हाच महागाईला हरवण्याचा यशस्वी मार्ग आहे.




# 'वूका' जग आणि तुमची संपत्ती

**बाजारातील चढ-उतार हे तुमच्या संपत्तीचे नुकसान करणारे ठरू नयेत. हा लेख तुम्हाला अशा काही सिद्ध रणनीतींची माहिती देईल, ज्यांच्या मदतीने तुम्ही अस्थिरतेच्या काळातही आपली गुंतवणूक सुरक्षित ठेवू शकाल.**

**काही महत्वाचे मुद्दे**

गुंतवणुकीचे विविध मालमत्ता प्रकारांमध्ये वैविध्यीकरण करा. अल्पकालीन चढ-उतारांकडे दुर्लक्ष करून दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करा आणि आपल्या योजनेवर ठाम राहा. किमान ३ ते ६ महिन्यांच्या खर्चासाठी पुरेसा रोख निधी हाताशी ठेवा. जोखमीची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आपल्या पोर्टफोलिओचे वेळोवेळी पुनरावलोकन करा.

जगभरातील वित्तीय बाजारपेठा अनेकदा मोठ्या अस्थिरतेच्या साक्षीदार असतात. विविध खंडांमधील भू-राजकीय संघर्ष आणि व्यापार युद्धे यामुळे आर्थिक अनिश्चितता निर्माण होते. अशा परिस्थितीत कंपन्यांच्या भविष्यातील नफ्याचा आणि विकासाचा अंदाज लावणे कठीण होऊन बसते, ज्याचा थेट परिणाम तुमच्या गुंतवणुकीवर होतो. या परिस्थितीला अनेकदा 'वूका' जग असे संबोधले जाते, ज्याचा अर्थ अस्थिरता, अनिश्चितता, गुंतागुंत आणि संदिग्धता असा होतो.

बाजारातील अस्थिरता म्हणजे काय?

जेव्हा किमती ऐतिहासिक उच्चांक आणि नीचांक यांच्या दरम्यान वेगाने बदलतात, तेव्हा बाजार अस्थिर मानला जातो. भारतातील 'एनएसई इंडिया विक्स' सारखे निर्देशांक शेअर बाजारातील या किमतींच्या अस्थिरतेचे मोजमाप करतात. उदाहरणार्थ, ७ एप्रिल २०२५ रोजी जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या भीतीमुळे आणि अमेरिका-चीनमधील व्यापार युद्धामुळे 'इंडिया विक्स' ६० टक्क्यांनी उसळला होता.

अस्थिरता संयमाने हाताळणे का आवश्यक आहे?

तुमची आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बाजारातील चढ-उतार योग्यरित्या हाताळणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक गुंतवणूकदार अशा काळात तर्कहीन वागतात आणि गर्दीचा हिस्सा बनून चुकीचे निर्णय घेतात, ज्यामुळे त्यांच्या संपत्तीचे नुकसान होते. कोव्हीड-१९ साथीच्या काळातही भारतीय शेअर बाजारात अशीच प्रवृत्ती दिसून आली होती, जिथे गुंतवणूकदारांनी इतरांचे पाहून घाबरून निर्णय घेतले आणि बाजारातील अस्थिरता अधिक वाढली. सुदैवाने, अशा गोंधळाच्या परिस्थितीत तुम्ही लक्ष केंद्रित आणि शांत राहू शकाल अशी काही धोरणे उपलब्ध आहेत. जरी या धोरणांची परिणामकारकता प्रत्येक वेळी निश्चित नसली, तरी तुमचे ज्ञान हेच अस्थिरतेच्या काळात तुमचे सर्वात मोठे सुरक्षा कवच ठरते.

### लक्षात ठेवण्यासारख्या तीन प्रमुख गोष्टी

१ **भावनिक शिस्त:** बाजारात घसरण झाली की भीतीपोटी शेअर्स विकणे टाळा. गुंतवणूक ही भविष्यासाठी असते, हे विसरू नका.

२ **नियमित गुंतवणूक:** एसआयपीच्या (ड्खझ) माध्यमातून गुंतवणूक सुरू ठेवल्यास बाजारातील घसरणीचा फायदा होऊन तुम्हाला अधिक युनिट्स मिळतात.

३ **तज्ज्ञांचा सल्ला:** स्वतः निर्णय घेण्याऐवजी प्रमाणित आर्थिक सल्लागाराची मदत घ्या, जेणेकरून तुमचे निर्णय वस्तुनिष्ठ असतील.

# विम्याचा हप्ता थकलाय?

धावपळीच्या जीवनशैलीत अनेकदा महत्त्वाच्या कामांचा विसर पडतो. व्यवसायिक दौरे, कौटुंबिक आणीबाणी किंवा कामाचा अतिरिक्त ताण यामुळे विम्याचा हप्ता (प्रीमियम) भरायचा राहून जाणे ही बाब आता नवीन राहिलेली नाही. मात्र, अशा वेळी तुमची पॉलिसी लगेच बंद पडते का? तर याचे उत्तर 'नाही' असे आहे. भारतातील बहुतांश विमा योजनांमध्ये 'ग्रेस पिरीयड' म्हणजेच सवलतीचा कालावधी दिलेला असतो, जो ग्राहकांसाठी एक सुरक्षा कवच ठरतो.

**■ काय असतो हा ग्रेस पिरियड?**

सोप्या भाषेत सांगायचे तर, विम्याचा हप्ता भरण्याची मूळ मुदत संपल्यानंतर कंपनीकडून जे अतिरिक्त १५ ते ३० दिवस दिले जातात, त्याला 'ग्रेस पिरीयड' म्हणतात. या काळात प्रीमियम भरलेला नसला तरीही तुमचे विमा संरक्षण सुरूच राहते. एखादी अघोषित आपत्ती ओढवल्यास हा कालावधी अक्षरशः जीवदान देणारा ठरू शकतो.

**■ विविध विमा प्रकारांमधील सवलत**

विम्याच्या प्रकारानुसार हा कालावधी बदलत असतो. जीवन विमा आणि आरोग्य विमा या दोन्ही क्षेत्रांत साधारणपणे १५ ते ३० दिवसांची सवलत मिळते आणि या काळात विमा संरक्षण पूर्णतः सक्रिय असते. वाहन विम्याच्या बाबतीत मात्र हा कालावधी शून्य ते ३० दिवसांपर्यंत असू शकतो. महत्त्वाचे म्हणजे, वाहन विम्यामध्ये सवलतीच्या काळात विमा संरक्षण सक्रिय राहीलच याची खात्री देता येत नाही, कारण ते संबंधित विमा कंपनीच्या अटींवर अवलंबून असते.

**■ पॉलिसी लॅप्स होणे म्हणजे नक्की काय?**

जर तुम्ही या सवलतीच्या कालावधीतही हप्ता भरला नाही, तर तुमची पॉलिसी 'लॅप्स' होते म्हणजेच ती रद्द केली जाते. पॉलिसी एकदा रद्द झाली की, तोपर्यंत जमा केलेले सर्व लाभ आणि विमा संरक्षण संपुष्टात येते. रद्द झालेली पॉलिसी पुन्हा सुरू करणे ही एक जटील प्रक्रिया असू शकते. यासाठी विमा कंपन्यांकडून दंड आकारला जाऊ शकतो, पुन्हा वैद्यकीय चाचण्या घेण्याची सक्ती केली जाऊ शकते किंवा काही प्रसंगी तुमचा नूतनीकरणाचा प्रस्ताव नाकारला जाण्याचीही शक्यता असते. एका उदाहरणावरून हे समजून घेऊया. समजा, श्रीयुत गुप्ता यांच्या मुदत विम्याचा (टर्म पॉलिसी) हप्ता १० जून रोजी भरायचा होता. कामाच्या व्यापात ते हा दिवस विसरले आणि त्यांना २५ जून रोजी याची आठवण झाली. त्यांच्या पॉलिसीमध्ये ३० दिवसांचा सवलतीचा कालावधी असल्यामुळे २५ जूनला हप्ता भरूनही त्यांची पॉलिसी सुरक्षित राहिली. मात्र, त्यांनी हा हप्ता १० जुलैपर्यंत भरला नसता, तर त्यांची पॉलिसी कायमची बंद पडली असती. सवलतीचा कालावधी हा कठीण प्रसंगी मदतीसाठी असतो, त्याचा वारंवार वापर करणे टाळले पाहिजे. विम्याचा हप्ता वेळेवर भरणे हाच आर्थिक स्थैर्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे. नियमांची योग्य जाण ठेवून आणि पूर्वनियोजन करून तुम्ही तुमच्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित ठेवू शकता आणि नाहक मानसिक ताण टाळू शकता.

# 'सीआरआर'चे गणित समजून घेताना...

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली असून या बैठकीत सध्याच्या जागतिक आर्थिक अस्थिरतेचा विचार करता महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी जाहीर केलेल्या धोरणानुसार रोख राखीव प्रमाण म्हणजेच 'कॅश रिझर्व्ह रेशो' मध्ये कोणताही बदल न करता तो स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. महागाईचा दर मर्यादित राखणे आणि बँकिंग क्षेत्रातील रोखता संतुलित ठेवणे या दुहेरी उद्देशाने रिझर्व्ह बँकेने हे पाऊल उचलले आहे. आगामी काळात विकासदराला गती देण्यासाठी बाजारात पुरेशी तरलता उपलब्ध राहील याची खबरदारी या धोरणातून घेण्यात आली आहे.

**काय आहे हे गणित?**

सीआरआर म्हणजे बँकांनी स्वतःच्या एकूण ठेवींपैकी ठराविक हिस्सा रिझर्व्ह बँकेकडे रोख स्वरूपात जमा करणे होय. बँकांकडे जमा होणाऱ्या प्रत्येक रुपयावर त्यांचे नियंत्रण नसते. सुरक्षिततेचा उपाय म्हणून यातील काही भाग मध्यवर्ती बँकेकडे गहाण ठेवावा लागतो. विशेष म्हणजे या रकमेवर रिझर्व्ह बँक कोणत्याही प्रकारचे व्याज देत नाही. बँका हा पैसा कर्ज म्हणून वाटू शकत नाहीत किंवा तो कुठेही गुंतवू शकत नाहीत. हे प्रमाण जेवढे जास्त असते तेवढा बँकांकडे कर्ज देण्यासाठी उपलब्ध असलेला पैसा कमी होतो. पर्यायाने बाजारातील चलनपुरवठा मर्यादित राहतो.

**महागाई नियंत्रणाचे प्रभावी अस्त्र**

जेव्हा बाजारात पैशांचा ओघ वाढतो आणि त्यामुळे वस्तूंच्या किमती गगनाला भिडू लागतात तेव्हा रिझर्व्ह बँक या

## नवे नियम

अस्त्राचा वापर करते. हे प्रमाण वाढवले की बँकांची कर्ज देण्याची क्षमता रोडावते. कर्ज महाग झाली की लोकांची खरेदी करण्याची क्षमता कमी होते आणि मागणी घटल्यामुळे पर्यायाने महागाई नियंत्रणात येण्यास मदत होते. या उलट जेव्हा अर्थव्यवस्थेत मरगळ येते आणि उद्योगांना गुंतवणुकीसाठी पैशांची गरज असते तेव्हा हे प्रमाण घटवले जाते. यामुळे बँकांकडे अधिक निधी उपलब्ध होतो आणि व्याजाचे दर कमी करून



अर्थचक्राला गती दिली जाते.

या नियमावलीचा मुख्य उद्देश केवळ महागाई रोखणे एवढाच नसून बँकिंग प्रणालीची विश्वासार्हता टिकवणे हा देखील आहे. कोणत्याही कारणाने बँकांवर संकट ओढवले किंवा ठेवीदारांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर पैसे काढण्यास सुरुवात केली तर अशा आपत्कालीन स्थितीत हा राखीव निधी संरक्षक कवच म्हणून काम करतो.

प्रत्येक पंधरवड्याला या निधीचा आढावा घेतला जातो. यामुळे बँकिंग व्यवहार करताना बँकांवर एक प्रकारची आर्थिक शिस्त लादली जाते. केवळ नफा कमावण्यासाठी सर्वच पैसे कर्जाच्या रूपात बाहेर जाऊ नयेत यासाठी हे नियंत्रण अत्यंत आवश्यक ठरते.

**गुंतवणूकदार आणि ग्राहकांवर होणारा परिणाम**

सर्वसामान्य कर्जदारासाठी हे प्रमाण अत्यंत महत्त्वाचे असते कारण बँकांचे व्याजाचे दर यावरच अवलंबून असतात. रिझर्व्ह बँकेने हे प्रमाण कमी केल्यास बँकांकडे असलेला अतिरिक्त निधी व्याजाचे दर कमी करण्यास प्रवृत्त करतो. याचा थेट फायदा गृहकर्ज किंवा वाहन कर्ज घेणाऱ्या ग्राहकांना होतो.

बँका आपला 'बेस रेट' ठरवताना देखील या प्रमाणाचा आधार घेतात. त्यामुळे पारदर्शक बँकिंग व्यवहारांसाठी हे एक महत्त्वाचे परिमाण ठरले आहे. आजच्या पतधोरणातून रिझर्व्ह बँकेने भविष्यातील आर्थिक स्थैर्याकडे लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**सीआरआरमधील बदलांचा इतिहास**

'सीआरआर'चा प्रवास पाहिला असता, भारतीय रिझर्व्ह बँकेने काळानुरूप आर्थिक संतुलनासाठी या दरात अनेक महत्त्वाचे बदल केल्याचे दिसून येते. साधारणपणे २०१०-२०११ च्या सुमारास जागतिक आर्थिक संकटानंतर उद्भवलेली महागाई थोपवण्यासाठी हा दर ६.०० टक्क्यांच्या उच्चांकावर होता. त्यानंतर, २०१२-२०१३ मध्ये आर्थिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने यात मोठी कपात करण्यात आली आणि हा दर ४.०० टक्क्यांवर आणला गेला. विशेष म्हणजे, २०१३ पासून ते २०२० च्या सुरुवातीपर्यंत रिझर्व्ह बँकेने हा दर ४.०० टक्क्यांवर स्थिर ठेवून बाजारपेठेत एक प्रकारची स्थिरता राखली होती.

मात्र, मार्च २०२० मध्ये कोरोना महामारीचे संकट ओढवल्यावर अर्थव्यवस्थेतील रोखता वाढवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने ऐतिहासिक पाऊल उचलत 'सीआरआर'मध्ये १०० बेसिस पॉइंट्सची कपात करून तो ३.०० टक्क्यांवर आणला. त्यानंतर, जेव्हा महागाईने पुन्हा डोके वर काढले, तेव्हा मे २०२२ मध्ये हा दर वाढवून ४.५० टक्क्यांपर्यंत नेण्यात आला होता. गेल्या दोन वर्षांतील जागतिक आर्थिक दबावाचा विचार करता, रिझर्व्ह बँकेने पुन्हा मवाळ धोरण स्वीकारले आणि २०२४-२०२५ या कालावधीत टप्प्याटप्प्याने कपात करत हा दर ३.०० टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. आता फेब्रुवारी २०२६ च्या पतधोरणातही हा दर ३.०० टक्क्यांवर स्थिर ठेवून रिझर्व्ह बँकेने बाजारात पुरेशी तरलता राखण्यावर आणि मध्यमवर्गीयांच्या कर्जाचे दर नियंत्रणात ठेवण्यावर भर दिला आहे.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नगर शाखेच्या अध्यक्षपदी प्रसाद बेडेकर

## प्रमुख कार्यवाहपदी जालिंदर शिंदे, कोषाध्यक्षपदी मधुरा झावरे, उपाध्यक्षपदी प्रशांत जठार, सुदर्शन कुलकर्णी यांची निवड







### पंचवार्षिक सभा उत्साहात

नगर – अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद – अहिल्यानगर उपनगर शाखेची पंचवार्षिक सभा उत्साहात झाली. या सभेस मध्यवर्ती कार्यालयाकडून निरीक्षक म्हणून नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके आणि नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे उपस्थित होते. सभेत २०२४ ते २०२५ या कालावधीत शाखेतर्फे राबविण्यात आलेल्या विविध नाट्य, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला तसेच आगामी कार्ययोजना आणि संस्थेच्या बळकटीकरणासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सभेची सुरुवात मागील कार्यकाळातील कामगिरीच्या अहवालाने झाली. या कालावधीत राज्यस्तरीय स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, व्यावसायिक नाटकांचे प्रयोग, संगीत कार्यक्रम तसेच ऐतिहासिक ठरलेले विभागीय नाट्यसंमेलन यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्याची नोंद घेण्यात आली. नाट्यचळवळ अधिक व्यापक करण्यासाठी प्रेक्षकांपर्यंत दर्जेदार नाट्यप्रयोग पोहोचविण्याचा प्रयत्न परिषदेने सातत्याने केल्याचे नमूद करण्यात आले.

सभेत मांडण्यात आलेल्या विविध ठरावांपैकी प्रमुख ठराव म्हणजे आगामी १०२ वे नाट्य संमेलन अहिल्यानगर येथे आयोजित करण्यासाठी मध्यवर्ती स्तरावर अधिकृत मागणी करणे हा होता. नगर शहराची सांस्कृतिक परंपरा आणि नाट्य क्षेत्रातील योगदान लक्षात घेता हे संमेलन येथे आयोजित व्हावे, अशी एकमुखी भावना सदस्यांनी व्यक्त केली.

तसेच स्वर्गीय उर्मिलाताई लोटके यांच्या स्मरणार्थ नाट्य क्षेत्रातील नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक उपक्रम आणि स्मरणार्थ कार्यक्रम आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

या प्रसंगी मध्यवर्ती निरीक्षक सतीश लोटके यांनी आपल्या मनोगतात परिषदेचे कार्य अतिशय स्तुत्य असल्याचे नमूद केले. नाट्यप्रेमी प्रेक्षकांची संख्या वाढविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेच्या कार्याविषयी व्यापक जनजागृती करणे, पारंपरिक कार्यक्रमांसोबतच नाविन्यपूर्ण आणि वेगळे उपक्रम राबविणे, तसेच उपनगर व शहर शाखांनी एकत्रितपणे संयुक्त कार्यक्रमांचे नियोजन करणे यावर त्यांनी भर दिला.

मध्यवर्ती निरीक्षक क्षितिज झावरे यांनी आपल्या भाषणात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही शंभर वर्षांची गौरवशाली परंपरा असलेली संस्था असल्याचे सांगून, संस्थेची पारदर्शकता आणि कार्यपद्धती जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. त्यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

सभेत पुढील नूतन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली :

अध्यक्ष : प्रसाद बेडेकर, प्रमुख कार्यवाह : जालिंदर शिंदे, कोषाध्यक्ष : मधुरा झावरे, सह कोषाध्यक्ष : शिरीष जोशी, सह कार्यवाहक : गणेश सपकाळ, तुषार देशमुख, आणि अभय गोले, कार्याध्यक्ष : पी. डी. कुलकर्णी, उपाध्यक्ष (प्रशासन) : प्रशांत जठार, उपाध्यक्ष (उपक्रम) : सुदर्शन कुलकर्णी, प्रमुख सल्लागार :– क्षितिज झावरे

कार्यकारिणी सदस्य : डॉ. मयुर तिरमखे, टिना इंगळे, ईश्वर बोरा, चैत्राली जावळे, देवाशीष शेडगे, विद्या जोशी, आरती अकोलकर, अमित खताळ, मधुर बागायत.

सभेचा समारोप प्रमुख कार्यवाहक जालिंदर शिंदे यांनी आभार प्रदर्शनाने केला.



हिंद की चादर गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष आरोग्य पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले असून त्यात सहभागी झालेले रुग्ण.

# 'हिंद की चादर' गुरु तेग बहादूर शहीदी समागम वर्षानिमित्त 'आरोग्य पंधरवड्या'चा एक हजार ९२ रुग्णांनी घेतला लाभ

नगर – हिंद की चादर गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विशेष आरोग्य पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले असून १५ फेब्रुवारी अखेर जिल्ह्यातील ७ ग्रामीण रुग्णालयांमध्ये १ हजार ९२ लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे.

या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालये व २२ ग्रामीण रुग्णालयांमध्ये ११ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत विविध वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वसामान्यांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे हा या मागील मुख्य उद्देश आहे.

या शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, रक्ताक्षय, क्षयरोग तपासणी, मुख, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी, गरोदर मातांची तपासणी, बाल लसीकरण, किरकोळ शस्त्रक्रिया, एक्सरे, ईसीजी व प्रयोगशाळा चाचण्या यांसारख्या महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे. याशिवाय पीएमजेएवाय व वय वंदन कार्डचे वितरणही करण्यात येत आहे.

शिबिरांच्या ठिकाणी शहीदी समागम कार्यक्रमाचे फलक लावून जनजागृती करण्यात येत असून, उपक्रमाची माहिती व जिओ टॅग केलेली छायाचित्रे संबंधित संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी या आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# गुरु तेग बहादूर यांच्या शौर्य-त्यागाची गाथा जनतेपर्यंत पोहोचणार !

### अहिल्यानगरात चित्ररथाचे लोकार्पण




नगर – खारघर, नवी मुंबई येथे येत्या २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी आयोजित 'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात व्यापक जनजागृती व्हावी यासाठी विशेष चित्ररथ तयार करण्यात आला आहे. या चित्ररथाचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आला.

या चित्ररथाद्वारे जिल्ह्यातील नागरिक, युवक, विविध समाजबांधव व भाविकांपर्यंत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, बलिदान व धर्मरक्षणाच्या महान कार्याची प्रेरणादायी माहिती पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी बलदेव सिंग वाही, रथ जिल्हा समन्वयक महादेव कोकाटे, अमरप्रीत वाही, सोमनाथ झाडे, अश्विंदर सिंग मल्होत्रा, रविंदर सिंग नारंग, सागर बक्षी, अमनदीप वाही, हितेश ओबेरॉय, हरविंदर सिंग नारंग, मोहिंदर सिंग धुप्पड, पियुष जग्गी, मोंटू लाँगियानी, राजेंद्र सिंग चावला, संजय आहुजा, हरप्रीत सिंग नारंग, संकेत गागरे, ब्रह्मा लाँगियानी यांच्यासह समाजबांधव, नागरिक व अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे बलिदान मानवतेच्या, धार्मिक सहिष्णुतेच्या आणि स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले ऐतिहासिक बलिदान आहे. त्यांच्या त्यागाचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातून दोन चित्ररथांच्या माध्यमातून विविध भागांत जनजागृती करण्यात येणार आहे. या चित्ररथांद्वारे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्याची माहिती, त्यांच्या शौर्याची गाथा तसेच शहीदी समागम कार्यक्रमाचे स्वरूप नागरिकांपर्यंत पोहोचविले जाणार आहे.

२८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी खारघर, नवी मुंबई येथे आयोजित भव्य कार्यक्रमात जिल्ह्यातील अधिकाधिक भाविकांनी सहभाग नोंदवावा व या प्रेरणादायी सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनीही श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचा गौरव करत, कार्यक्रमाच्या जनजागृती साठी राबविण्यात येणारा चित्ररथ उपक्रम निश्चितच प्रभावी ठरेल, असे मत व्यक्त केले.

२८ फेब्रुवारी पर्यंत जिल्ह्यातील विविध तालुके व गावांमध्ये फिरविण्यात येणाऱ्या या चित्ररथाच्या माध्यमातून शीख–शिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजासह जिल्ह्यातील सर्व नऊ समाजांतील भाविक व नागरिकांमध्ये 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमाची व्यापक माहिती देण्यात येणार आहे.

# 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी अहिल्यानगरमध्ये २२ फेब्रुवारीला मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी वर्षाचे औचित्य साधून जिल्हा प्रशासन व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने २२ फेब्रुवारी रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अहिल्यानगरमधील गोबिंदपुरा येथील गुरुद्वारा भाई दया सिंह जी या ठिकाणी हे शिबीर पार पडणार असून, ते सर्व नागरिकांसाठी पूर्णपणे विनामूल्य असणार आहे. समाजातील वाहन चालक, कारखाना कामगार, मजूर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांचे आरोग्य सुदृढ राहावे, या मुख्य उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे ङ्कसर्वसाधारण आरोग्य तपासणी, मोफत रक्त चाचण्या, नेत्र व श्रवण तपासणी, हृदयरोग, स्त्रीरोग व अस्थिरोग तज्ज्ञांचा विशेष सल्ला या सेवा दिल्या जाणार आहेत. 'आयुष्यमान भारत' योजनेसाठी जागेवरच नावनोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची व त्यांच्या कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, शिबिराच्या ठिकाणी त्यांच्या जीवनावर आधारित विशेष लघुपट दाखवण्यात येणार आहे. या समाजोपयोगी उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी गरजू नागरिक, तसेच सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन गुरुद्वारा भाई दया सिंह जी चे सेवेकरी व जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# नगरमध्ये १९ फेब्रुवारी रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १९ फेब्रुवारी रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील सिटी केअर हॉस्पिटल मध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी ७३८५१९५९६२, ९२०९६३२५०२ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करावी.



संत रामपाल महाराज सेवा कमिटी व जनकल्याण रक्तकेंद्राचे वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# संत रामपाल महाराज सेवा कमिटी व 'जनकल्याण'तर्फे रक्तदान शिबिर

नगर – सतलोक आश्रम ढवळपुरी येथे १५, १६, १७ फेब्रुवारी रोजी जगद्गुरु तत्त्वदर्शी संत रामपाल महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत ३९वा बोध दिवस साजरा होणार आहे. यानिमित्त हुंडा मुक्ती विवाह, रक्तदान शिबिर, थॅलेसेमिया व सिकलसेल जनजागृती, निशुल्क नाम दीक्षा व अध्यात्मिक प्रदर्शनी या स्वरूपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश या भागातून सुमारे दीड लाख भक्तांची उपस्थिती या सोहळ्यासाठी लाभणार आहे.

या धार्मिक कार्यक्रमात संत रामपाल सेवा कमिटी व जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिव्यांगांच्या सेवेसाठी व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

यावेळी संत रामपाल सेवा कमिटीचे मोहनदास (नागपूर), भगवानजी पाटील (पुणे), रमेशदास (नाशिक) कैलास दास, विश्वासदास (सातारा) तसेच जनकल्याण रक्त केंद्राचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, शरद बळे, गौरव पठाडे आदी उपस्थित होते.

# महापौर ज्योतीताई गाडे यांची महापालिकेत अचानक पाहणी, स्वच्छतेबाबत व्यक्त केली नाराजी

## जन्ममृत्यू दाखले तातडीने द्या, नागरिकांना रांगेत उभं राहावं लागू नये शहरातील लसीकरण, आरोग्य सेवा आणि विवाह नोंदणीच्या कामाचा घेतला सखोल आढावा

नगर – महानगरपालिकेच्या कामकाजात गती आणण्यासाठी आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी महापौर ज्योतीताई गाडे यांनी जुन्या महापालिकेतील विविध विभागांना अचानक भेट दिली. या पाहणीदरम्यान त्यांनी स्वच्छतेच्या निकृष्ट स्थितीबाबत नाराजी व्यक्त करत तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.



महानगरपालिकेच्या कामकाजात गती आणण्यासाठी आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी महापौर ज्योतीताई गाडे यांनी जुन्या महापालिकेतील विविध विभागांना अचानक भेट दिली. (छाया : लहू दळवी)

महापौर ज्योतीताई गाडे यांनी आपल्या वडिल कै. शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्यशैलीप्रमाणेच तळागाळात जाऊन अधिकाऱ्यांकडून प्रश्न विचारत सखोल माहिती घेतली. त्यांच्या थेट संवादशैलीमुळे अधिकाऱ्यांनाही आपल्या कामाची पुन्हा तपासणी करावी लागली.

पाहणीदरम्यान महापौरांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, आपण नागरिकांना स्वच्छतेचे धडे देतो, पण आपल्या स्वतःच्या कार्यालयातच अस्वच्छता असणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. दोन दिवसांत जुन्या महापालिकेतील सर्व विभागांची स्वच्छता करण्यात यावी.


त्यांनी पुढे सांगितले की, महापालिकेच्या प्रतिष्ठेला आणि नागरिकांच्या अपेक्षांना साजेसे कामकाज झाले पाहिजे. नागरिकांचा विश्वास टिकवणे ही आपली जबाबदारी आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी जन्ममृत्यू विभागाची पाहणी करत नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. त्या म्हणाल्या महापालिकेत दाखल्यांसाठी नागरिकांना ताटकळत रांगेत उभे राहावे लागते. हा त्रास संपवण्यासाठी तत्काळ उपाययोजना करा. सर्व रेकॉर्ड संगणकीकृत करा, जेणेकरून दाखले तातडीने देता येतील. त्यांनी सावेडी उपनगरात स्वतंत्र दाखला कार्यालय सुरू करण्याच्या सूचना दिल्या आणि नागरिकांसाठी ई–सेवा प्रणाली सुरू करण्याची कल्पना मांडली. महापौरांनी आरोग्य विभाग प्रमुख डॉ. सतीश राजुरकर यांच्याकडून शहरातील लसीकरण आणि आरोग्यसेवा याबाबत सविस्तर माहिती घेतली. राजुरकर यांनी सांगितले की, शहरात १०३ आशा सेविका कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून लहान मुलांच्या लसीकरणाची माहिती संकलित केली जाते. सध्या शहरात २५० लसीकरण केंद्रे कार्यरत आहेत. त्यांनी पुढे नमूद केले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध आरोग्य योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू आहे. 'टीबी मुक्त भारत' अभियानांतर्गत नागरिकांची तपासणी नियमित सुरू आहे.

महापौर गाडे यांनी विवाह नोंदणी विभागाचीही पाहणी केली आणि नागरिकांचे प्रश्न तातडीने सोडवण्याचे आदेश दिले. महापौरांनी जुन्या महापालिकेतील जळालेल्या सभागृहाचीही पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्या म्हणाल्या की, शहराच्या प्रतिष्ठेचे प्रतीक असलेले हे सभागृह पुनर्बांधणीसाठी आवश्यक नियोजन करा. या ठिकाणी आधुनिक सुविधा असलेले बहुउद्देशीय सभागृह उभारण्याचा विचार केला जाईल.

या पाहणीवेळी नगरसेवक ऋग्वेद गंधे, संतोष गांधी, महावीर कांकरिया, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २० फेब्रुवारी रोजी मेंदू विकार मोफत तपासणी शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मेंदू विकार मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते २ यावेळेत तपासणी शिबिर होईल. मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. अद्वैत गिते, डॉ. वैशाली कदम, लहान मुलांच्या मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. स्नेहा म्हस्के रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

सतत डोकेदुखी, मायग्रेन, फिट, हातापायाला मुंग्या येणे, अपस्मार, नसावरील सूज, तोल जाणे, चक्कर येणे, अर्धांगवायू, पॅरालिसीस इत्यादी आजारांवर शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन केले जाईल. हॉस्पिटलमध्ये ईईजी, एनसीव्ही, व्हिईपी, बेरा, ईएमजी, ब्लिंक रिफ्लेक्स या तपासण्या अत्याधुनिक मशीनद्वारे उपलब्ध आहेत.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक मशीनद्वारे डायलेसिस सुविधा उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवाही उपलब्ध आहे. डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंटसह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम आर आय २५०० रूपयात करण्यात येतात. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क –०२४१–२३२०४७३/७४/७५/७६.

# आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. रंगोली जिरवणकर यांची ओपीडी सेवा



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत आरोग्य सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. याठिकाणी आता तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत पुणे येथील त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. रंगोली जिरवणकर दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी सकाळी ११ ते २ ओपीडी सेवा देणार आहेत.

डॉ. जिरवणकर या अनुभवी त्वचा रोग तज्ज्ञ असून वाघोली पुणे येथे प्रक्टीस करतात. आजकाल विविध कारणांमुळे त्वचा तसेच केसांच्या समस्या वाढल्याचे दिसून येते. डॉ. जिरवणकर या त्वचा व केसांच्या समस्यांवर प्रभावी उपचार करतात.

विविध त्वचारोग, सोरायसिस, गजकर्ण, मुरूम, पिंपल्सवर अत्याधुनिक उपचार, केमिकल फिलिंग, लेझर ट्रीटमेंट, चेहऱ्यावरील खड्डयांसाठी सीओटू ट्रीटमेंट, काळ्या डागांवर उपचार, क्रॉनिक डिसऑर्डर, केस गळतीवर उपचार, केसातील कोंडा, हेअर ट्रान्सप्लांट, लर्जी, सौंदर्य समस्या विषयी उपचार मार्गदर्शन केले जाईल. या अत्याधुनिक उपचार सुविधांच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ७०३०९५९४९४.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

